वसा सक्षम मातृत्वाचा
MOM-able
फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटर
सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ४
आता मुंबई, पुणे, नाशिक या शहरात जाण्याची गरज नाही
IVF
ट्रिटमेंट घ्या मातृत्वाचा आनंद आपल्या संगमनेरमध्ये
आजच आपली अपॉईंटमेंट बुक करा
8080 215 215
9699 327 301
दुसरा मजला, संजीवन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नाशिक-पुणे रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 39, 340/-
20 कॅरेट मणी = 1, 26, 675/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 14, 000/-
16 कॅरेट मुरणी = 101, 340/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ८६ । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) । गुरूवार । ०९/०४/२०२६ । पान - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# जगासाठी दिलासादायक बातमी; दोन आठवड्यांसाठी युद्धविराम

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरुद्ध दोन आठवड्यांच्या युद्धविरामाची घोषणा केली आहे. त्यांनी 'ट्रुथ' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सांगितले की, इराणने होर्मुझची सामुद्रधुनी तत्काळ पुन्हा उघडल्यास, दोन आठवड्यांसाठी बॉम्बहल्ला आणि हल्ले थांबवण्यास ते सहमत झाले आहेत. ट्रम्प यांनी सांगितले की, पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसिम मुनीर यांच्या आवाहनानंतर त्यांनी हा निर्णय घेतला आहे. ते म्हणाले आम्हाला इराणकडून १० कलमी प्रस्ताव मिळाला आहे. दोन्ही देशांमधील सर्व विवादास्पद मुद्द्यांवर एकमत झाले आहे. कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी पुढील दोन आठवडे आवश्यक असतील. इराणनेही युद्धविरामाची पुष्टी केली आहे. इराणच्या सर्वोच्च राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने सांगितले की, ११ एप्रिलपासून पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे पुढील चर्चा होईल. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी दोन आठवड्यांसाठी पुन्हा उघडण्याची घोषणा केली आणि आपल्या नागरिकांना या काळात राष्ट्रीय ऐक्य टिकवून ठेवण्याचे आणि पूर्ण उत्साहात विजय साजरा करत राहण्याचे आवाहन केले.

ट्रम्प यांनी इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांचे युद्धविरामावरील निवेदन शेअर केले. ट्रम्प यांनी त्यांच्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांचे निवेदन शेअर केले. या निवेदनाने दोन आठवड्यांच्या शस्त्रसंधी कराराला आणि होर्मुझ सामुद्रधुनी उघडण्यास दुजोरा दिला. आपल्या निवेदनात, अराघची यांनी पाकिस्तान आणि तेथील नेतृत्वाचे आभार मानले आणि म्हटले की या प्रदेशातील संघर्ष संपवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी सांगितले की, जर इराणवरील हल्ले थांबले, तर पाकिस्तानचे सशस्त्र दल देखील आपली बचावात्मक कारवाई थांबवतील.




## तेलवाहतुकीचा मार्ग महागणार?

जवळपास ४० दिवसांपासून इराण वि. अमेरिका–इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे चटके सोसणाऱ्या जगाला आता एक खुशखबर मिळाली आहे. अमेरिका–इराणने युद्धविरामााल मान्यत दिली असून या सीजफायर करारानुसार, दोन्ही देश पुढले २ आठवडे एकमेकांवर हल्ले करणार नाहीत. तसेच होर्मुजची सामुद्रधुनीदेखील लवकरच उघडण्याची चिन्ह दिसत आहेत. शस्त्रसंधीनंतर इराणनेही काही अटी मान्य केल्या आहेत. त्यामुळे आता तेलाची वाहतूक सुरू होऊ शकेल. मात्र या जगात फुकट असं काहीच मिळत नाही, त्यामुळे इराणने होर्मुजची सामुद्रधुनी खुली करण्यास होकार दर्शवला असला तरी यासाठी आता पैसा मोजावे लागण्याची शक्यता आहे. या सामुद्रधुनीतून जहाजांची वाहतूक करण्यासाठी संबंधित देशांना आता इराण तसेच ओमानला टोल टॅक्स द्यावा लागेल. याबबात कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसली तरी, हा कर शस्त्रसंधीच्या अटींमध्ये समाविष्ट असल्याचे म्हटले जात आहे.

यापूर्वी, शहबाज शरीफ यांनी 'एक्स'वर सांगितले होते की, त्यांनी ट्रम्प यांना इराणला दिलेली मुदत दोन आठवड्यांनी वाढवण्याची विनंती केली आहे. शरीफ यांनी दावा केला की, पाकिस्ताननेही सदिच्छा म्हणून इराणला होर्मुझ सामुद्रधुनी दोन आठवड्यांसाठी उघडण्याची विनंती केली आहे.

अमेरिकेने इराणविरुद्धच्या सर्व आक्रमक लष्करी कारवाया थांबवल्या आहेत. नाव न सांगण्याच्या अटीवर एका अधिकाऱ्याने सांगितले की, आक्रमक कारवाया पूर्णपणे थांबवण्यात आल्या आहेत, मात्र बचावात्मक कारवाया आणि सुरक्षा उपाय सुरू राहतील.

इराण आणि अमेरिका यांच्यातील शस्त्रसंधी कराराबाबत पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ म्हणाले की, हा करार लेबनॉनसह इतर ठिकाणीही तात्काळ अंमलात आला आहे. शरीफ यांनी दोन्ही देशांच्या नेतृत्वाचे आभार मानले आणि त्यांच्या प्रतिनिधींना १० एप्रिल रोजी इस्लामाबादमध्ये चर्चेसाठी आमंत्रित केले. या बैठकीत सर्व विवादांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यावर चर्चा होईल. (पान ४)

## इराणच्या कठोर अटी

* इराणी सशस्त्र दलांच्या समन्वयाने होणारी 'हॉर्मुझ सामुद्रधुनी'तून नियंत्रित वाहतूक; ज्यामुळे इराणला एक अद्वितीय आर्थिक आणि भू–राजकीय स्थान प्राप्त होईल.
* प्रतिकार आघाडी'च्या सर्व घटकांविरुद्धचे युद्ध समाप्त करण्याची आवश्यकता.
* प्रदेशातील सर्व लष्करी तळ आणि तैनातीच्या ठिकाणांवरून अमेरिकन लढाऊ सैन्याची माघार.
* हॉर्मुझ सामुद्रधुनीमध्ये अशा प्रकारे सुरक्षित वाहतूक नियमावली (प्रोटोकॉल) प्रस्थापित करणे, ज्यामुळे मान्य केलेल्या नियमावलीनुसार इराणचे वर्चस्व अबाधित राहील याची हमी मिळेल.
* अंदाजानुसार, इराणला झालेल्या नुकसानीची पूर्ण भरपाई.
* सर्व प्राथमिक आणि दुय्यम निर्बंध, तसेच 'बोर्ड ऑफ गव्हर्नर्स' आणि 'सुरक्षा परिषदे'चे ठराव रद्द करणे.
* परदेशात गोठवून ठेवलेल्या इराणच्या सर्व मालमत्ता आणि संपत्तीची मुक्तता.
* या सर्व बाबींना सुरक्षा परिषदेच्या एका बंधनकारक ठरावाद्वारे अधिकृत मान्यता देणे.

# दुधगंगा पतसंस्था घोटाळ्यातील ४४ मालमत्ता जप्त

## अध्यक्ष, प्रवर्तक, भागीदार, संचालक, व्यवस्थापक, कर्मचाऱ्यांचा समावेश

युवावार्ता (प्रतिनिधी)

**संगमनेर** - ठेवीदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दुधगंगा नागरी सहकारी पतसंस्था व भ्रष्ट पदाधिकारी-अधिकाऱ्यांच्या विरोधात शासनाने कारवाई केली आहे. ठेवीदारांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने या पतसंस्थेची आणि गैरव्यवहारात सामील असलेल्या पदाधिकाऱ्यांची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्य शासनाच्या गृह विभागाच्या प्रधान सचिवांनी दिलेल्या आदेशावरून प्रांताधिकारी उपविभागीय दंडाधिकारी अरुण उंडे यांनी याबाबतचे आदेश जारी केले असून, संस्थेचे अध्यक्ष, प्रवर्तक, भागीदार, संचालक, व्यवस्थापक, कर्मचारी व आणखी काही लोकांच्या मालकीच्या ४४ स्थावर मालमत्तांवर कब्जेदार सदरी 'महाराष्ट्र शासन' नाव लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या पतसंस्थेची संबंधित गैरव्यवहार करणाऱ्या लोकांविरुद्ध संगमनेर शहर पोलिस ठाण्यात ठेवीदारांच्या फसवणुकीचा गुन्हा दाखल आहे. पतसंस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी ठेवीदारांना मुदतीअंती व्याजासह रक्कम परत करण्याचे आमिष दाखवून ठेवी स्वीकारल्या होत्या, परंतु मुदत संपल्यानंतरही ठेवीदारांना त्यांची रक्कम परत न करता फसवणूक केली. या गैरव्यवहारामुळे ठेवीदारांचे मोठे नुकसान झाले असून, शासनाची खात्री पटली आहे. ही संस्था ठेवीदारांचे पैसे परत करण्यास असमर्थ आहे. इतकेच नव्हे तर ठेवीदारांच्या पैशातून पदाधिकाऱ्यांनी स्वतःच्या आणि इतरांच्या नावे मालमत्ता संपादित केल्याचेही समोर आले आहे.



## सात-बारावर महाराष्ट्र शासनाचे नाव

सर्व जप्त केलेल्या मिळकतींच्या सात–बारा उताऱ्यावर कब्जेदार म्हणून महाराष्ट्र शासन अशी नोंद करण्याचे आदेश सक्षम प्राधिकारी अरुण उंडे यांनी तहसीलदार संगमनेर आणि राहुरी, तसेच उपअधीक्षक भूमी अभिलेख यांना दिले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित कायदेशीर बाबींकडे दुर्लक्ष झाल्यास किंवा त्यात दिरंगाई झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील, असेही या आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ मधील कलम ४ आणि ५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने या मालमत्ता जप्त करण्याचा निर्णय घेतला आहे. या मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपविभागीय दंडाधिकारी, संगमनेर यांची सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

जप्त करण्यात आलेल्या मालमत्तांमध्ये सुकेवाडी, समनापूर, खंदरमाळवाडी, संगमनेर बुद्रुक, वडझरी, वडगाव लांडगा, घुलेवाडी आणि देवळाली प्रवरा (ता. राहुरी) येथील शेतजमिनींचा समावेश आहे. या मालमत्ता प्रामुख्याने दूधगंगा पतसंस्था, पतसंस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब दामोधर कुटे, विमलबाई (पान २ वर)

# अण्णासाहेब पाटील महामंडळाची फसवणूक

## चार महिन्यांनंतरही आरोपी मोकाट

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या अहिल्यानगर शाखेची सहा लाखांची फसवणूक केल्याप्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. गुन्हा दाखल होऊन चार महिन्यांचा कालावधी उलटून गेला, मात्र एकाही आरोपीला अद्याप अटक झालेली नाही. हा तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे देण्याची मागणी पोलिस अधीक्षकांकडे करणार असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी येथे पत्रकार परिषदेत सांगितले.

गौरव शंकर मंचरे आणि राहुल बाळासाहेब चोळके (रा. साकोरी, ता. राहाता) अशी संशयित आरोपींची नावे आहेत. बनावट कागदपत्रे तयार करून त्यांनी महामंडळाची ६ लाख ७४ हजार रुपयांची फसवणूक केली आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक मंगेश गोंटला यांच्याकडे देण्यात आला असून त्यांच्या मार्फत तपास सुरू आहे. परंतु, यातील एकाही आरोपीला अटक झालेली नाही. चार महिन्यानंतरही तपासात प्रगती नसल्याने महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी हा तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे देण्याची मागणी केली असून, यासंदर्भात ते जिल्हा पोलिस अधीक्षकांची भेट घेणार असल्याचे यावेळी सांगितले.

महामंडळाकडून कर्जावर व्याजाच्या माध्यमातून अर्थसहाय्य करण्यात येते. व्याजाची रक्कम खातेदारांच्या खात्यात जमा केली जाते. आरोपींनी बनावट कागदपत्रे तयार करून त्याआधारे महामंडळाची फसवणूक केली असून पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत. मात्र, चार महिन्यानंतरदेखील आरोपी हाती लागलेले नाहीत.

तोफखाना पोलिस ठाण्यात शैक्षणिक संस्थांसह इतर आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल असून, या गुन्ह्यांचा तपासही मंद गतीने सुरू आहे. महामंडळाच्या फसवणुकीबाबत चार महिने उलटूनही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने नाराजी व्यक्त होत असून, पोलिसांच्या तपासावरही संशय व्यक्त केला जात आहे.

दरम्यान, ६ एप्रिल रोजी शिर्डी येथे शिर्डी व परिसरातील तालुक्यांतील लाभार्थ्यांचा आढावा घेऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यात आले. त्यानंतर ७ एप्रिल रोजी नगर येथील कौशल्य विकास विभागाच्या कार्यालयात उपस्थित राहून त्यांनी जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या अडचणी समजून घेतल्या. यावेळी महामंडळाच्या कामाचा तपशील देताना पाटील यांनी सांगितले की, महामंडळामुळे १.८० लाख उद्योजक तयार झाले असून १ हजार ६३४ कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचा व्याज परतावा महामंडळाने लाभार्थ्यांना दिला आहे.

ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
सुवर्णस्पर्शाने होईल
प्रत्येक क्षण समृद्धीचा...
अक्षय तृतीया आणि लग्नसराईसाठी खास ऑफर
दागिन्यांच्या मजुरीवर
20 ते 60 % सूट
पर्यंत भरघोस सूट!
ऑफर कालावधी: १ एप्रिल ते १८ मे २०२६
सोने । चांदी । हिरे । अशोक चौक, संगमनेर. मो : 937201 2044

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग । डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
संगमनेर मार्केटमध्ये..
२२ कॅरेट सोन्याचा दर..
३००० रुपयांपेक्षा कमी !
हो हो..३००० रुपयांनी दर कमी म्हणून आजच भेट द्या...
ऑफर फक्त 20/4/2026 पर्यंत
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/70661 49090

# शरद पवारांचे मोठे वक्तव्य

## अजितसोबत जे घडले त्यानंतर कुटुंबाने निवडणूक लढवायला नको होती

मुंबई (वृत्तसंस्था)

बारामती मतदारसंघातील कौटुंबिक कलहावर शरद पवार यांनी मौन सोडले असून, पवार कुटुंबातील सदस्याने निवडणूक लढवायला नको होती, असे ते म्हणाले. त्यांनी सुनेत्रा पवार यांच्याबाबतही एक महत्त्वपूर्ण वक्तव्य केले.महाराष्ट्राच्या राजकारणातील 'चाणक्य' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शरद पवार यांनी आपल्या वक्तव्यांनी पुन्हा एकदा राजकीय घडामोडींना हवा दिली आहे. सोमवारी राज्यसभा सदस्य म्हणून शपथ घेतल्यानंतर पत्रकारांशी बोलताना शरद पवार यांनी बारामती लोकसभा जागेसाठीची अंतर्गत लढाई आणि पवार घराण्यातील सुरू असलेल्या वादावर उघडपणे भाष्य केले.शरद पवार यांनी निवडणूक लढवल्याबद्दल अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांच्यावर थेट टीका केली आहे. ते म्हणाले की, अजित पवार ज्या दुःखद परिस्थितीतून जात आहेत, ते पाहता पवार



कुटुंबातील कोणत्याही सदस्याने यावेळी बारामतीतून निवडणूक लढवायला नको होती. या वक्तव्यावरून असे दिसून येते की, कुटुंबातील या राजकीय फुटीमुळे शरद पवार अजूनही व्यथित आहेत.सुनेत्रा पवार यांच्याबद्दल विचारले असता, त्यांनी स्पष्ट केले, पवार कुटुंबात अशी परंपरा आहे की कुटुंबातील सर्वात ज्येष्ठ सदस्य प्रमुखाची भूमिका बजावतो. त्या अर्थाने मी प्रमुख आहे. सुनेत्रा माझ्याकडे आशीर्वादासाठी आल्या होत्या आणि मी त्यांना आशीर्वाद दिला आहे, पण याचा अर्थ असा नाही की मी बारामतीमध्ये त्यांच्यासाठी प्रचार करेन. त्यांनी पुढे असेही सांगितले की, सुनेत्रा यांचा बिनविरोध विजय सुनिश्चित करण्यासाठी त्यांनी कोणताही प्रयत्न केला नाही, कारण निवडणुकीच्या राजकारणात प्रत्येक उमेदवाराला माहित असते की त्यांना कोणत्या ना कोणत्या आव्हानाचा सामना करावा लागेल.

सुनेत्रा पवार यांच्या विजयाच्या शक्यतांवर टीका करताना शरद पवार स्पष्टपणे म्हणाले, मी काही ज्योतिषी नाही की कोण जिंकेल हे सांगू शकेन. त्यांनी असेही सूचित केले की, राज्यसभा सदस्य म्हणून दिल्लीत असूनही, ते महाराष्ट्राच्या राजकारणावर नियंत्रण ठेवत दिल्लीतूनच रणनीतिक 'बाण' चालवत राहतील. अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांनी काँग्रेस पक्षाविरोधात केलेल्या वक्तव्याला शरद पवार यांनीही प्रत्युत्तर दिले आहे. राजकारणात परिपक्व व्हायला वेळ लागतो, असे उपरोधिकपणे त्यांनी म्हटले होते.

# पुण्यात जैन व मराठा समाजाची पत्रकार परिषद

## छ. शिवाजी महाराजांवरील वक्तव्याचा निषेध

पुणे (वृत्तसंस्था)

मुंबईत दोन जैन मुनींनी छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी ताराबाई यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांनंतर पुण्यात जैन आणि मराठा समाजातर्फे संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. समाजात कोणताही गैरसमज किंवा तणाव निर्माण होऊ नये, या उद्देशाने ही परिषद घेण्यात आली.

या परिषदेत दोन्ही समाजांच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, संबंधित वक्तव्यांचा जैन समाजाशी कोणताही संबंध नाही. ही विधाने वैयक्तिक असून राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. जैन समाजाने अशा वक्तव्यांचा तीव्र निषेध केला. युवक काँग्रेसचे अक्षय जैन यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आणि देशाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्याविषयी प्रत्येकाच्या मनात आदर आणि अभिमान आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या वक्तव्यांना कोणताही पाठिंबा नसून ती संबंधित व्यक्तींची वैयक्तिक मते आहेत. समाजात तणाव निर्माण करण्याच्या प्रयत्नांना एकत्रितपणे विरोध केला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. मराठा मोर्चाचे अनिकेत देशमाने यांनी जैन समाजाने घेतलेल्या स्पष्ट भूमिकेचे स्वागत केले. कोणत्याही गैरसमजाला वाव न देता शांतता आणि एकता टिकवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भावना तीव्र असल्या तरी संयम राखणे गरजेचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. जितो पुणेचे लक्ष्मीकांत खाबिया यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य अतुलनीय असल्याचे सांगितले. त्यांचे मोजमाप करण्याचा अधिकार कोणालाही नाही. जैन समाज नेहमीच शांतता, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांचा पुरस्कार करतो, त्यामुळे अशा वक्तव्यांना समाजात स्थान नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेत दोन्ही समाजांनी एकत्रितपणे महाराष्ट्रातील एकता, बंधुता आणि परस्पर सन्मानाची परंपरा जपण्याचा निर्धार व्यक्त केला. अफवा आणि चुकीच्या माहितीपासून दूर राहून संवाद आणि संयमाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा टिकवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. या परिषदेला अक्षय जैन, अनिकेत देशमाने, लक्ष्मीकांत खाबिया, दिनेश सुतार, मिलिंद फडे, सुधीर मते, राजेंद्र सुराणा, नितीन जैन, अनिल भोसुरे, गोविंद पवार, समाधान नागवे, माऊली दुचाल, अर्चना शहा, श्रीपाल ललवाणी, दिलीप खोबरे, रमेश पाटील, डॉ. सुजाता बरगळे, अनिल भंडारी, अँडी जय कोठारी आदी मान्यवर उपस्थित होते.

# नाशिक 'भोंदू बाबा' प्रकरणात ११ गुन्हे

## एसआयटीचा खुलासा; ४६५० व्हिडिओ लिंक हटवल्या

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिकमधील भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणात पोलिसांनी कारवाईचा वेग वाढवला असून, आरोपीविरुद्ध एकूण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या गुन्ह्यांमध्ये महिलांचे लैंगिक शोषण, अंधश्रद्धा पसरवणे, जादूटोणा आणि फसवणूक यांसारख्या गंभीर आरोपांचा समावेश आहे. या प्रकरणातील पीडित महिलांचे काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने त्यांची बदनामी झाल्याची बाब समोर आली होती.



या पार्श्वभूमीवर तपासासाठी नियुक्त विशेष तपास पथकाच्या प्रमुख तेजस्वी सातपुते यांनी पत्रकार परिषद घेऊन तपासातील महत्त्वाची माहिती दिली. सातपुते यांनी सांगितले की, आरोपी अशोक खरात हा पीडितांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेत होता. तो महिलांना दैवी शक्ती असल्याचे सांगून त्यांना भीती दाखवत असे. कुटुंबीयांच्या मृत्यूची भीती दाखवणे, बदनामीची धमकी देणे अशा प्रकारांनी तो महिलांचे लैंगिक शोषण करत होता. तसेच खडे, चिंचोके मध यांसारख्या वस्तूंच्या माध्यमातून पैसे उकळत होता. ईशान्यश्वर मंदिर परिसरात अंधाराचा फायदा घेत दैवी शक्ती असल्याचा भास निर्माण करून अंधश्रद्धा पसरवली जात असल्याचेही तपासात समोर आले आहे.

पुढे बोलताना सातपुते यांनी नमूद केले की, समाजात काय म्हणतील या भीतीमुळे अनेक महिलांनी अन्याय सहन केला. मात्र, आता त्यांनी धाडसाने पुढे येत गुन्हे दाखल केले आहेत. त्यांनी नागरिकांना आवाहन केले की, पीडितांची ओळख उघड करू नये, त्यांचे व्हिडिओ शेअर करू नयेत किंवा मोबाईलमध्ये ठेवू नयेत, कारण यामुळे त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. सायबर पथकाने या प्रकरणात मोठी कारवाई करत आतापर्यंत ४,६५० व्हिडिओ लिंक हटवल्या आहेत. चार सदस्यांची विशेष टीम सतत सोशल मीडियावर लक्ष ठेवून असून, नवीन व्हिडिओ अपलोड होताच त्यावर तात्काळ कारवाई केली जात आहे. आक्षेपार्ह पोस्ट टाकणारे काही ग्रुपही बंद करण्यात आले आहेत.

व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या दोन जणांना अटक करण्यात आली असून, अहिल्यानगर पोलिसांनी यासंदर्भात सहा जणांना अटक केली आहे. दरम्यान, पोलिसांनी स्पष्ट केले आहे की लैंगिक अत्याचाराच्या पीडितांची ओळख उघड केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. या प्रकरणाच्या तपासात पुढील काळात आणखी धक्कादायक माहिती समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# शिक्षक भरती घोटाळ्याला लागणार ब्रेक

## ई-ऑफिस प्रणालीसह 'ओटीपी'ची सक्ती

मुंबई (वृत्तसंस्था)

बोगस शालार्थ आयडी तयार करून झालेल्या राज्यव्यापी शिक्षक भरती घोटाळ्याची शिक्षण विभागाने गंभीर दखल घेतली आहे. यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पासवर्ड आणि युजर आयडी इतरांच्या हाती लागल्याने हा मोठा गैरप्रकार उघडकीस आला होता. यापुढे अशा घोटाळ्यांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी शिक्षण विभागाने आता ई-ऑफिस प्रणालीचा वापर सक्तीचा केला असून, प्रणालीत लॉगिन करण्यासाठी प्रत्येक वेळी ओटीपी अनिवार्य केल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली आहे.



बनावट सह्यांचा सुळसुळाट यापूर्वी कामाच्या व्यस्ततेमुळे वरिष्ठ अधिकारी विश्वासाने आपले पासवर्ड आणि युजर आयडी संबंधित लिपिकांकडे देत असत. मात्र, या विश्वासाचा गैरफायदा घेत हे पासवर्ड हस्ते-परहस्ते अनेकांपर्यंत पोहोचले. परिणामी, त्यातून शिक्षक नियुक्तीचे अनेक बोगस शालार्थ आयडी तयार झाले. धक्कादायक बाब म्हणजे, शिक्षणाधिकाऱ्यांच्या बनावट सह्या करून नियुक्तीच्या प्रस्तावांना परस्पर मान्यता देण्यात आली. आतापर्यंत तपासणी पूर्ण झालेल्या ४३१ पैकी तब्बल ४२४ नियुक्त्या अवैध ठरल्या आहेत. कागदपत्रे अचूक असल्याने केवळ ७ शिक्षकांचे पगार सुरू करण्यात आले आहेत. इतर १०२ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सुनावणी पूर्ण होऊन निर्णय येणे बाकी आहे, तर उर्वरित कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.संबंधित संस्थाचालक शिक्षणाधिकाऱ्याला रिक्त पदे वा पद भरण्याची परवानगी मागतो. परवानगी मिळाल्यावर रीतसर जाहिरात काढली जाते. त्यानंतर मुलाखती, पात्रता तपासणी व गुणदान तक्ता तयार होतो.

# रेपो दर जैसे थे

## जागतिक अनिश्चिततेदरम्यान रिझर्व्ह बँकेचा सावध पवित्रा

मुंबई (वृत्तसंस्था)

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची बैठक ६ ते ८ एप्रिल दरम्यान पार पडली. या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांची माहिती रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी दिली. यावेळी त्यांनी रेपो दरात कोणताही बदल केला नसल्याचं सांगितले. त्यामुळे सामान्यांना ईएमआयचा भार कमी होण्यासाठी आणखी वाट पाहावी लागणार आहे. नवीन आर्थिक वर्षातील पतधोरण समितीची ही पहिलीच बैठक होती. दरम्यान, आता रेपो दर ५.२५ टक्क्यांवर कायम आहेत. यापूर्वी देखील रिझर्व्ह बँकेनं वेट अँड वॉच धोरणाचा अवलंब करत रेपो दरात कोणताही बदल केला नव्हता.यावेळी भारताची अर्थव्यवस्था मजबूत असल्याचं संजय मल्होत्रा म्हणाले. पुरवठा साखळीत काही बाधा आहेत, त्यामुळे काही क्षेत्रांवर त्याचा विपरित परिणाम झाला आहे. कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतींमुळे जागतिक अर्थव्यवस्थांच्या वाढीत बाधा निर्माण झाल्याचंही त्यांनी नमूद केले. यापूर्वी, फेब्रुवारीमध्ये, आरबीआयच्या पतधोरण समितीने रेपो दर ५.२५% वर कायम ठेवण्याचा निर्णय घेतला होता. परंतु त्याआधी डिसेंबर २०२५ च्या धोरणामध्ये रेपो दरात २५ पॉइंट्सची कपात करण्यात आली होती, ज्यामुळे रेपो दर ५.५०% वरून ५.२५% पर्यंत खाली आला होता. त्याही आधी, जून २०२५ मध्ये, ५० पॉइंट्सची कपात लागू करण्यात आली होती, ज्यामुळे दर ६% वरून ५.५% पर्यंत कमी झाला होता.काय म्हणाले होते तज्ज्ञ ?स्टेट बँक ऑफ इंडियाचे (एसबीआय) मुख्य अर्थतज्ज्ञ सौम्य कांती घोष यांनी रिझर्व्ह बँक सावध पवित्रा घेईल असं म्हटलं होतं. रुपया प्रति डॉलर ९३ च्या पुढे गेल्याने आणि कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १०० डॉलरच्या वर गेल्याने भारत आधीच जागतिक संकटाच्या गर्तेत सापडला आहे. या दोन घटकांमुळे देशात आयातीत महागाई वाढण्याचा धोका आहे. याशिवाय, नजीकच्या भविष्यात 'सुपर एल निनो'च्या शक्यतेने चिंता वाढवली आहे, कारण त्याचा मान्सून आणि अन्नधान्याच्या किमतींवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे आरबीआयला आपलं धोरण आणखी कठोर करण्यास भाग पडेल, असा इशारा त्यांनी दिला होता.

# आरबीआयची मोठी कारवाई

## शिरपूर मर्चंट्स बँकेचा परवाना रद्द

धुळे (वृत्तसंस्था)





रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया देशातील विविध बँकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्याचं काम करते. बँका, वित्तीय संस्था, फायनान्स कंपन्या यांच्या कामकाजाची तपासणी देखील आरबीआयकडून केली जाते. ज्या बँका बँकिंग नियमन कायदा आणि आरबीआयच्या विविध मार्गदर्शक सूचनांचं पालन करत नाहीत त्यांच्यावर आरबीआयकडून कारवाई केली जाते. महाराष्ट्रातील एका बँकेचा परवाना आरबीआयनं रद्द केला आहे. एका बँकेला आर्थिक दंड करण्यात आला आहे.


आरबीआयकडून द शिरपूर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शिरपूर या बँकेचा परवाना २ एप्रिलच्या आदेशानं रद्द करण्यात आल्याचं म्हटलं आहे. आरबीआयनं ही कारवाई बँकिंग नियमन कायदा १९४९ च्या सेक्शन २२ आणि सेक्शन ५६ चा वापर करत ही कारवाई केली आहे. आरबीआयनं या बँकेला ६ एप्रिल २०२६ या दिवशी कामकाज बंद झाल्यानंतर कामकाज बंद करण्याचे आदेश देण्यात आले होते. या बँकेवरील कारवाईबाबत महाराष्ट्राच्या सहकार आयुक्त, सहकारी संस्था नोंदणी महानिरीक्षक यांना माहिती देण्यात आली असून या बँकेचं कामकाज बंद करणे आणि लिक्विडेटर नेमण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

आरबीआयच्या प्रसिद्धीपत्रकानुसार बँकिंग कायद्यांच्या विविध कलमांनुसार द शिरपूर मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, शिरपूर या बँकेकडे पुरेसं भांडवल नाही. बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदींची पूर्तता करण्यास बँक अपयशी ठरली. बँकेचं कामकाज सुरु ठेवणं ठेवीदारांवर अन्यायकारक ठरेल, असं आरबीआयनं म्हटलं. बँकेची सध्याची आर्थिक स्थिती ठेवीदारांची पूर्ण रक्कम देण्याइतकी चांगली नाही. सार्वजनिक हितासाठी बँकेचं कामकाज बंद करण्यात आलं आहे.

# २१ एप्रिलला पंतप्रधान मोदींच्या हस्ते पचपदरा रिफायनरीचे उद्घाटन

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

पंतप्रधान नरेंद्र मोदी २१ एप्रिल रोजी बालोतरा जिल्ह्यातील पचपदरा रिफायनरीच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन करतील. मारवाडसह संपूर्ण राजस्थानसाठी रिफायनरीचे वेगळे महत्त्व आहे. या प्रकल्पामुळे बाडमेर-जैसलमेरमध्ये औद्योगिक क्लस्टर विकसित होईल. यामुळे पायाभूत सुविधा, लॉजिस्टिक्स आणि सहायक उद्योगांना चालना मिळेल. जानेवारीपासूनच रिफायनरीच्या पहिल्या टप्प्याच्या ट्रायल रन (कच्च्या तेलावर प्रक्रिया) ची तयारी सुरू करण्यात आली होती. यात लवकरच व्यावसायिक उत्पादन सुरू होईल. मोदी २ महिन्यांत दुसऱ्यांदा राजस्थानला येत आहेत. पंतप्रधान कार्यालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर मुख्यमंत्री



भजनलाल शर्मा यांनी त्यांच्या एक्स अकाउंटवर पोस्ट करून ही माहिती दिली आहे.पचपदरा रिफायनरीचे भूमिपूजन पहिल्यांदा २२ सप्टेंबर २०१३ रोजी झाले होते. त्यावेळी तत्कालीन यूपीएच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी रिफायनरीचे भूमिपूजन केले होते. राज्यात अशोक गेहलोत यांचे सरकार होते. या प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे ३७,२३० कोटी रुपये होती.सत्ता परिवर्तनानंतर आणि रिफायनरीच्या अटींमध्ये बदल झाल्यानंतर पंतप्रधान मोदींनी १६ जानेवारी २०१८ रोजी पुन्हा एकदा या कामाचे औपचारिक उद्घाटन केले. त्यावेळी त्याची किंमत वाढून ४३ हजार १२९ कोटी रुपये झाली होती. याचे काम ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु मागील काँग्रेस सरकारच्या काळात २ जून २०२३ रोजी प्रकल्पाची किंमत वाढून ७२,९३७ कोटी रुपये झाली. भजनलाल सरकारच्या काळात कंपनीने २४ जुलै २०२५ रोजी रिफायनरीच्या खर्चात दुसऱ्या सुधारणेचा प्रस्ताव सरकारला सादर केला. त्यानंतर त्याची किंमत वाढून ७९ हजार ४५९ कोटी रुपये झाली आहे. रिफायनरी एचपीसीएल आणि राजस्थान सरकारचा एक संयुक्त उपक्रम आहे.

# दुधगंगा पतसंस्था...

पान १ वरून -

भाऊसाहेब कुटे, शकुंतला भाऊसाहेब कुटे, भाऊसाहेब कुटे, दादासाहेब भाऊसाहेब कुटे, उत्तम शंकर लांडगे, सोमनाथ कारभारी सातपुते, अमोल भाऊसाहेब कुटे, उल्हास रावसाहेब थोरात, लहानु गणपत कुटे आणि अजित कृष्णराव कदम यांनी विक्री केलेले सध्याचे मालक शुभम शेखर चंगेडिया यांच्या नावावर किंवा त्यांच्या हिश्श्याच्या आहेत. या प्रशासकीय कारवाईमुळे ठेवीदारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# राज्य सरकारचा मोठा निर्णय

## यापुढे 'डिलिव्हरी बॉईज'ची तपासणी बंधनकारक

मुंबई (वृत्तसंस्था)

ऑनलाईन प्लॅटफॉर्म, गिग आणि डिलिव्हरी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांमुळे ग्राहकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर, झोमॅटो, स्विगी, ब्लिंकिट यांसारख्या कंपन्यांच्या डिलिव्हरी पार्टनर्सची कसून पोलीस पडताळणी करणे आता अनिवार्य होणार आहे. ग्राहकांना सुरक्षित आणि निर्दोष सेवा मिळावी, यासाठी कामगार आणि गृह विभागाने संयुक्तपणे सर्वसमावेशक आराखडा तयार करावा, असे निर्देश कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी मंगळवारी दिले.मंत्रालयात आयोजित कामगार आणि गृह विभागाच्या संयुक्त बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सुमित वानखेडे, दादाराव केचे, माजी खासदार किरीट सोमय्या आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. सध्या बहुतांश कंपन्या 'फेसलेस' पद्धतीने कामगारांची नोंदणी करतात आणि त्यांच्या माहितीची पडताळणी करण्यासाठी खासगी (थर्ड पार्टी) संस्थांची मदत घेतात. मात्र, या संस्थांना पडताळणीचे अधिकार कोणी दिले आणि त्यांच्या प्रक्रियेचा कायदेशीर आधार काय, असा कळीचा मुद्दा मंत्री फुंडकर यांनी उपस्थित केला. गिग वर्कर्सची नोंदणी करणाऱ्या कंपन्यांनीच त्यांच्या पार्श्वभूमी तपासाची पूर्ण जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असे निर्देश त्यांनी दिले.ऑनलाईन सेवा देणाऱ्या कंपन्या थेट कर्मचारी भरती न करता तृतीय पक्ष संस्थांमार्फत कामगार नेमतात. यामुळे मालक-कामगार संबंधांमध्ये कायदेशीर अस्पष्टता राहते. ही त्रुटी दूर करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. त्यानुसार, सर्व गिग कामगारांची सायबर विभागाकडे नोंदणी अनिवार्य करणे. प्रत्येक डिलिव्हरी पार्टनरकडे क्यू-आर कोड असलेले ओळखपत्र असणे आणि ग्राहकाने मागणी केल्यास ते दाखवणे सक्तीचे असेल.

# २ वर्षांच्या बालकाचे दोन विश्वविक्रम

हैदराबाद- बुद्धीबळ म्हणजे संयम आणि तल्लख बुद्धिमत्तेचा खेळ. जिथे मोठ्यांनाही विचार करावा लागतो, तिथे एका अवघ्या २ वर्षे ११ महिने वयाच्या चिमुरड्याने असा काही पराक्रम केला आहे की, अवघ्या जगाचे डोळे विस्फारले आहेत. कोंडा श्रेयांश मुरली कृष्णा पटेल असे या बालकाचे नाव असून, त्याने बुद्धीबळाच्या खेळात चक्क दोन विश्वविक्रम आपल्या नावावर केले आहेत.

रे चेस अकॅडमी तर्फे आयोजित एका विशेष कार्यक्रमात श्रेयांशने आपली बुद्धिमत्ता सिद्ध केली. त्याने केवळ १५ मिनिटे ५२ सेकंदात ९३ 'बॅक-रँक चेकमेट्स' सोडवले. इतक्या कमी वेळात अचूक चाली रचणे ही एक दुर्मिळ कामगिरी मानली जात आहे. एवढ्यावरच न थांबता, श्रेयांशने अवघ्या १ तास ९ मिनिटे ९ सेकंदात तब्बल २१ चेस बोर्ड व्यवस्थित मांडून दुसरा विश्वविक्रम प्रस्थापित केला.ज्युबली हिल्स येथील आमदारांच्या कॉलनीतील सांस्कृतिक केंद्रात हा सोहळा पार पडला. यावेळी तेलंगणाचे उपमुख्यमंत्री भट्टी विक्रमार्क, मंत्री कोंडा सुरेखा आणि वाकीती श्रीहरी यांसारखे दिग्गज उपस्थित होते. श्रेयांश हा मंत्री कोंडा सुरेखा यांचा नातू आहे.

# पदवी अभ्यासक्रम चार वर्षांचा, नव शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची (२०२०) अंमलबजावणी आता अंतिम टप्प्यात आली असून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील चौथे वर्ष (ऑनर्स आणि ऑनर्स विथ रिसर्च) सुरू करण्यास राज्य शासनाने अधिकृत मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना आता पदवीस्तरावरच संशोधनाची संधी मिळणार आहे. त्यासाठीचे सविस्तर मार्गदर्शक नियम उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मंगळवारी जारी केले.

चौथ्या वर्षात प्रवेश घेण्यासाठी शासनाने दोन स्वतंत्र मार्ग निश्चित केले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना 'ऑनर्स विथ रिसर्च' ही पदवी हवी आहे, त्यांच्यासाठी कठोर शैक्षणिक निकष लावण्यात आले आहेत. त्यानुसार 'ऑनर्स विथ रिसर्च'साठी विद्यार्थ्याला पहिल्या तीन वर्षांत किमान ७.५ 'सीजीपीए' (संचयी ग्रेड पॉइंट



सरासरी) मिळवणे आवश्यक आहे. शिवाय विद्यार्थ्यांनी पहिल्या तीन वर्षांत साधारण १२० ते १३२ क्रेडिट्स पूर्ण केलेले असावेत. या विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षात १२ क्रेडिट्सचा विशेष संशोधन प्रकल्प किंवा प्रबंध पूर्ण करावा लागेल. सर्वच महाविद्यालयांना चौथ्या वर्षाचे वर्ग थेट सुरू करता येणार नाहीत. ज्या महाविद्यालयांकडे आधीपासूनच पदव्युत्तर (पीजी) अभ्यासक्रम आणि संबंधित विषयात पीएचडी (पीचडी) केंद्र उपलब्ध आहे, त्यांनाच 'ऑनर्स विथ रिसर्च' सुरू करण्याची स्वयंचलित परवानगी असेल.

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरिक्षत, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि
उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
● मेडिसिन ● सर्जरी
● स्त्रीरोग - प्रसुति
● मुळव्याध-भगंदर-फिशर
● लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



# 'ॲग्रोवन'च्या कार्यकारी संपादकपदी रमेश जाधव यांची नियुक्ती

मुंबई (प्रतिनिधी)-

'ॲग्रोवन'चे संपादक संचालक आदिनाथ चव्हाण ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या जागी रमेश जाधव यांची 'ग्रोवन'चे कार्यकारी संपादक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते सध्या 'ॲग्रोवन'चे निवासी संपादक म्हणून कार्यरत आहेत. 'ॲग्रोवन'चे संपादक संचालक आदिनाथ चव्हाण यांनी 'सकाळ माध्यम समूहा'मध्ये सुमारे ३८ वर्षे सेवा बजावली. 'सकाळ'च्या कोल्हापूर आवृत्तीत बातमीदार, उपसंपादक, वरिष्ठ उपसंपादक, सहयोगी संपादक आणि गोवा येथे 'गोमन्तक'चे सहसंपादक अशा विविध पदांवर काम केल्यानंतर सप्टेंबर २००९ मध्ये 'ग्रोवन'चे कार्यकारी संपादक म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर संपादक व संपादक संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी पार पाडली. अन्नप्रक्रिया प्रकल्पांना १९८२ कोटींचे कर्जवाटप.



रमेश जाधव यांना पत्रकारितेचा सुमारे २३ वर्षांचा अनुभव आहे. त्यांनी वसुंधरा इकॉलॉजी ण्ड रिसर्च फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेत 'सुसंवाद' या मासिकाचे संपादक म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. 'ग्रोवन'मध्ये प्रशिक्षणार्थी बातमीदार व उपसंपादक, उपवृत्तसंपादक, दिवाळी अंकांचे संपादन, 'ॲग्रोवन' डिजिटलच्या संपादकीय विभागाचे प्रमुख, 'ग्रोवन'चे निवासी संपादक अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या. आम्ही चालवू हा पुढे वारसा.

रॉयटर्स वृत्तसंस्थेच्या रॉयटर्स मार्केट लाइट या शेतीविषयक माहितीसेवेमध्ये महाराष्ट्र प्रतिनिधी व त्यानंतर वृत्तसंपादक म्हणून त्यांनी सुमारे आठ वर्षे काम पाहिले. जाधव यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या कृषी महाविद्यालय, कोल्हापूर येथून कृषी शाखेचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागातून (रानडे इन्स्टिट्यूट) पदव्युत्तर पदवी संपादन केली. शेती अर्थकारण, पर्यावरण, राजकीय अर्थव्यवस्था, धोरण संशोधन, कमोडिटी मार्केट, मानववंशशास्त्र, मॉन्सून हे त्यांच्या आवडीचे अभ्यासविषय आहेत. शेती प्रश्नांची धोरणात्मक चिकित्सा करणारी 'पोशिंद्याचे आख्यानः एक प्रश्नोपनिषद' व 'शिवार, समाज आणि राजकारण' ही त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत. 'पोशिंद्याचे आख्यान..' या पुस्तकाला मराठवाडा साहित्य परिषद व महाराष्ट्र शासन यांचे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांनी पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागात अभ्यागत व्याख्याता म्हणून काही काळ काम केले.

# महावितरणचा आयपीओ लवकरच

## शेतकऱ्यांना आता 'महा सोलर ॲग्रो'कडून वीज

मुंबई (प्रतिनिधी)-

वाणिज्यिक, घरगुती व इतर सर्व बिगर कृषि ग्राहकांसाठीची वितरण संस्था आणि कृषि ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देण्यासाठी एमएसईबी सोलार ग्रो पॉवर लिमिटेड (एमएसएपीएल) असे विभाजन करून दोन स्वतंत्र कंपन्या स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

बिगर कृषि वितरण क्षेत्रातील महावितरण या कंपनीला भांडवली बाजारात सूचीबद्ध करण्यासाठी आयपीओ आणण्यास देखील या बैठकीत मान्यता देण्यात आली. महावितरण कंपनीने विविध पायाभूत योजनांसाठी घेतलेल्या सुमारे ३२ हजार ६७९ कोटी रुपयांच्या कर्जास शासन हमी आहे. या कर्ज दायित्वापोटी महाराष्ट्र शासन पंधरा वर्षे मुदतीचे दीर्घकालीन सरकारी रोखे जारी करणार आहे. यामुळे महावितरणवरील कर्जाचा बोजा कमी होऊन आर्थिक स्थिती आणखी चांगली होण्यास मदत होणार आहे. राज्यातील ग्राहकांना ऊर्जा सुरक्षा आणि गुणात्मक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महावितरणची आर्थिक स्थिती भक्कम करणे आणि वितरण व्यवस्थेत शाश्वतता निर्माण करण्यासाठी ही पुनर्रचना करण्यात येणार आहे. ऊर्जा क्षेत्रातील बाजारपेठीय संधीचा लाभ घेण्यासाठी अशा दोन कंपन्यांची निर्मिती केली जाईल.

एमएसईबी सोलार ॲग्रो पॉवर लिमिटेड या कंपनीच्या माध्यमातून शेतीसाठीच्या वीज पुरवठ्याचे नियोजन आणि सौर ऊर्जेवर आधारित कृषि ऊर्जा प्रणाली विकसित करण्यासाठी संस्थात्मक आधारभूत रचना निर्माण होणार आहे. महावितरणाच्या आर्थिक पुनर्रचनेनंतर राज्यातील वीज वितरण व्यवसाय दोन स्वतंत्र कंपन्याकडून केले जाईल. यात कृषि वितरण संस्था म्हणजेच एमएसईबी सोलार ग्रो पॉवर लिमिटेड- एमएसएपीएल कंपनी केवळ कृषि ग्राहकांना वीज पुरवठा व संबंधित सेवा उपलब्ध करून देईल.

विभाजनानंतर सहा ते नऊ महिन्यांच्या कालावधीत महावितरण आयपीओ आणला जाईल. त्यासाठी सेबीकडे आवश्यक त्या मंजुरी व वित्तीय प्रक्रिया पूर्ण केल्या जातील. महावितरणचा आयपीओ - नवीन समभाग (फ्रेश इश्यू) आणि शासनाकडील समभाग विक्री (ऑफर फॉर सेल) याद्वारे आणला जाईल. या दोन्ही कंपन्यांच्या स्थापनेमुळे कृषि तसेच औद्योगिक, घरगुती ग्राहकांना स्थिर व अखंडित वीज पुरवठा उपलब्ध करून देता येणार आहे. विशेषत: शेतकऱ्यांना दिवसा व अखंडित वीज पुरवठा मिळणार आहे. कृषि क्षेत्राच्या सिंचनासाठी आवश्यक सौर ऊर्जिकरणाला चालना मिळणार आहे. औद्योगिक ग्राहकांना स्थिर व अखंडित वीजपुरवठा, दरवाढीवरील ताण कमी होणार, हरित ऊर्जेच्या वापरासाठी प्रोत्साहन मिळेल. तसेच घरगुती ग्राहकांसाठी वीज दरांमध्ये अधिक स्थिरता येईल, सेवा गुणवत्तेमध्ये सुधारणा, डिजिटल बिलिंग व ग्राहक सेवा अधिक सक्षम होणार आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवा – मंत्री आबिटकर

नाशिक (प्रतिनिधी)-

नाशिक, त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर येणाऱ्या भाविकांना आरोग्य सेवा देण्यास आरोग्य यंत्रणा पूर्णतः सज्ज ठेवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

आरोग्य मंत्रालयातील समिती कक्षात आरोग्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यासाठी बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी नाशिक परिमंडळातील आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री आबिटकर म्हणाले की, यंदा सिंहस्थ पर्वणी निमित्त नाशिक मधील तेरा घाटावर अंदाजे १२ कोटी भाविक येण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर स्थानिक लोकप्रतिनिधी, कुंभमेळा प्राधिकरण आणि विविध विभागांच्या समन्वयातून त्र्यंबक, रामकुंड, सीता गुंफा, साधू धाम, मुक्ती धाम व इतर धार्मिक स्थळावर आरोग्य सुविधा सक्षम करण्यावर भर देण्यात यावा. लवकरच स्वतः नाशिक येथे भेट देऊन आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेणार असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी सांगितले.



सिंहस्थ पर्वणी काळात गर्दीमुळे संपर्क यंत्रणेत अडचणी निर्माण होऊ नसे, यासाठी आरोग्य विभागाने रुग्णसेवेसाठी वॉकी-टॉकीचा वापर करणे, त्याबाबतची माहिती अद्यावत ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण प्रणाली उभारण्याचे निर्देशही आरोग्य मंत्री आबिटकर यांनी दिले.

देशभरातून येणाऱ्या भाविकांनी कोणत्याही प्रकारची वैद्यकीय गैरसोय होऊ नये, याची काळजी घ्यावी. आरोग्य सेवा व्यवस्थापनासाठी विविध स्तरांवर जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत. भाविकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनाने व्यापक तयारी करण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले.

कुंभमेळ्याच्या दरम्यान रोगराईचा प्रसार रोखण्यासाठी नाशिक, त्र्यंबक, रामकुंड, सीतामंडी व इतर सर्व धार्मिक स्थळावरील स्वच्छतेवर विशेष भर द्यावा. पाण्याच्या स्त्रोतांची तपासणी करावी. 'आरोग्य रक्षक किट' व पुरेसा औषध साठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.

# सर्वोदय पतसंस्थेचे ३५१ कोटी ठेवी संकलनाचे उद्दिष्ट पुर्ण

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

महाराष्ट्रातील पहिली नागरी सहकारी पतसंस्था म्हणून ओळख असलेल्या सर्वोदय पतसंस्थेने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात ठेवींचा विक्रम करीत रु. ३५१ कोटी ७५ लाखाच्या ठेवी संकलनाचा टप्पा पार केला असून, कर्जवाटप २८१ कोटी ८७ लाख रुपये केलेले आहे. तसेच सर्व तरतुदी वजा जाता निव्वळ नफा रु. ६ कोटी ७५ लाख इतका मिळविला आहे, अशी माहिती संस्थेचे चेअरमन कल्पेश मेहता यांनी दिली.




नुकत्याच झालेल्या आर्थिक वर्षात संस्थेने एकत्रित व्यवसाय रु. ६३३ कोटी ६१ लाखाचा केला असून, संस्थेचे खेळते भांडवल रु. ४४५ कोटी ३१ लाखाचे आहे. तसेच संस्थेची गुंतवणूक रु. १४२ कोटी ७३ लाखाची असून, रु. ८५ कोटी १७ लाखाचा भक्कम स्वनिधी असल्याचे संस्थेचे ज्येष्ठ संचालक वैभव शाह यांनी सांगितले.

संस्थेने वसुलीमध्ये सातत्य राखत थकबाकी कमी करण्यात यश मिळवत एनपीए शून्य टक्के राखला असून, सी.डी. रेश्यो ६८.३७% आहे, अशी माहिती संस्थेचे जनरल मॅनेजर मधुकर वनम यांनी दिली.

तसेच संस्थेच्या आर्थिक प्रगतीचा आलेख उंचावत ठेवण्यात संस्थेचे चेअरमन व सर्व संचालक तसेच कर्मचारी वृंद यांचा देखील तितकाच सहभाग असून, संस्थेचे सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार व खातेदार आणि हितचिंतक यांचे देखील सहकार्य नेहमीच लाभते. त्याबद्दल संस्थेचे व्हा. चेअरमन विनीत मेहता यांनी सर्वांचे आभार व्यक्त करून, यापुढेही असेच सहकार्य मिळावे, अशी आशा व्यक्त केली.

सदर प्रसंगी आशिष अरविंदकुमार शाह, संकेत विलास शाह, सचिन येवंतीलाल शाह, आशिष अरविंद शाह, सचिन येवंतीलाल शाह, संकेत विलास शाह, पंकज मनसुखलाल बजानिया, नितेश जयकुमार शाह, श्रीपाल राजेंद्र ओहरा, प्रसाद खुशालचंद कटारिया, रोशन राजेंद्र मेहता, भरतकुमार शिवजीभाई दिवाणी, सौ. क्षमा गुणसेन शाह, सौ. कविता प्रदिप शेठ, अरुण शिवराम नारायणे, राजेंद्र दामोदर काळे, नितीन रमेश भागवत, व मयुर विजयकुमार मेहता व शैलेंद्र अमृतलाल ओहरा आदी संचालक उपस्थित होते. अशी माहिती संस्थेचे मॅनेजर राजेश शांताराम ढगे यांनी दिली.

# राज्यात माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धीमत्ता स्वतंत्र विभाग स्थापन

मुंबई

(प्रतिनिधी)-

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्यात राज्यातील स्थितीचा आढावा घेत मंत्रिमंडळाने विकासाशी संबंधित ५ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यात महाराष्ट्रात नवीन स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धीमत्ता विभाग स्थापन करण्याच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचाही समावेश आहे. या निर्णयांमुळे राज्याच्या डिजिटल गव्हर्नन्सला गती मिळण्याचा अंदाज आहे. सरकारने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (एमआरडीपी) राबविण्यासही मंजुरी दिली आहे.



महाराष्ट्रात नवीन स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धीमत्ता विभाग, विकसित भारत २०४७ मधील विकसित महाराष्ट्राच्या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी महत्त्वाचे पाऊल आहे. माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे रूपांतर इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धीमत्ता आयुक्तालयात होणार. मंत्रालयीन विभाग, आयुक्त कार्यालय व सर्व जिल्ह्यांसाठी कायमस्वरूपी पदांचा समावेश असलेले नवीन माहिती तंत्रज्ञान संवर्ग (आयटी कॅडर) निर्माण होणार. राज्यातील माहिती तंत्रज्ञान, एआय, डिजिटल गव्हर्नन्सला गती लाभणार. महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग प्लिकेशन सेंटर (एमआरएसएसी) आता कंपनी होणार. सोसायटी अधिनियम १८६० अंतर्गत नोंदणी रद्द करून कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम ८ अंतर्गत कंपनी स्थापन होणार. या निर्णयामुळे रस्ते माहिती प्रणाली, नगररचना, जलयुक्त शिवार - पाणलोट विकास, डोंगरी विकास योजना, ई-पंचनामा, महा ग्री टेक, कांदळवन अभ्यास, भूजल व्यवस्थापन, खनिज व खाणींचा अभ्यासाला गतीमानता लाभणार.

भू-स्थानिक तंत्रज्ञान (जिओस्पेशियल टेक्नॉलॉजी)चा वापर करून प्रशासनात गतिमानता आणण्याकरिता महाराष्ट्र जिओटेक्नॉलॉजी प्लिकेशन सेंटर (महाजिओटेक) कंपनी स्थापन होणार. आधुनिक तंत्रज्ञान, संशोधन, भूस्थानिक नवोप्रक्रम व उद्योजकता विभागामुळे विद्यार्थी, व्यावसायिक, संशोधकांसाठी शैक्षणिक कार्यक्रम राबविता येणार.


HAPPY Birthday



श्री. संतोष रखमाजी हासे
व्हा. चेअरमन
स.म.भा.सं.थो.स. साखर कारखाना



मा. श्री. गोरखशेठ कुटे
संचालक, वसंत लॉन्स, संगमनेर



मा. श्री. अजित काकडे
उद्योजक



मा. श्री. नरेंद्र लचके
उपाध्यक्ष, संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र, मुंबई



श्री. जयंत नवले
व्हा. चेअरमन, श्री संगम ग्रामीण बिगर शेती पतसंस्था, संगमनेर



डॉ. सागर गोपाळे
संचालक,
एक्सपर्ट डेंटल क्लिनीक

शुभेच्छुक
दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता
YUVA POLYPRINT & PACKAGING INDUSTRIES

# राज्यातील ११ आयएएस अधिकाऱ्यांची बदली

राज्यात सध्या आयएएस (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदलीचा सपाटा सुरू असून, काही दिवसांपूर्वीच २५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, दिव्यांग कल्याण विभागाचे माजी सचिव तुकाराम मुंढे यांची देखील बदली करण्यात आली होती, त्यासह अनेक जिल्हाधिकाऱ्यांचे खांदेपालटही केल्याचं दिसून आलं. त्यात, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नागपूरच्या कलेक्टरपदी नियुक्ती करण्यात आली होती. आता, सामान्य प्रशासन विभागाकडून आणखी ११ आयएएस अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. राहुल रंजन महिवाल व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे, यांची महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथे सदस्य सचिव पदावर बदली करण्यात आली आहे. तर, श्वेता सिंघल यांची विशेष निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे बदली करण्यात आली आहे. त्यांसह आणखी बड्या अधिकाऱ्यांना नव्या ठिकाणी पोस्टिंग देण्यात आलं आहे.

# संपादकीय...

## भारत-नेपाळ संबंधांचे नवे समीकरण

भारत आणि नेपाळ यांचे संबंध हे केवळ दोन शेजारी देशांपुरते मर्यादित नसून ते इतिहास, संस्कृती, धर्म आणि लोकजीवन यांच्या घट्ट नात्याने जोडलेले आहेत. हिमालयाच्या कुशीत वसलेला नेपाळ हा भारताचा पारंपरिक मित्रदेश मानला जातो. दोन्ही देशांतील लोकांमध्ये 'रोटी-बेटी'चे नाते आहे, सीमारेषा खुली आहे आणि नागरिकांना व्हिसाविना परस्पर देशात जाण्या-येण्याची मुभा आहे. त्यामुळे भारत-नेपाळ संबंध हे दक्षिण आशियातील सर्वात वैशिष्ट्यपूर्ण आणि संवेदनशील संबंधांपैकी एक मानले जातात. मात्र गेल्या काही वर्षांत या संबंधांमध्ये आलेली कटुता आणि तणाव ही चिंतेची बाब ठरली होती. विशेषतः के. पी. शर्मा ओली यांच्या कार्यकाळात भारत-नेपाळ संबंधांमध्ये दुरावा वाढताना दिसला. भारताचा काही भूभाग नेपाळच्या नव्या नकाशात दाखवणे, सीमावादाचा मुद्दा उचलणे, तसेच भारतविरोधी भूमिका घेणे या घटनांमुळे दोन्ही देशांतील विश्वास कमी झाला. या काळात चीनचा प्रभाव नेपाळमध्ये वाढत असल्याचेही स्पष्ट दिसले. चीनने आर्थिक गुंतवणूक, पायाभूत सुविधा प्रकल्प आणि राजनैतिक हालचालींच्या माध्यमातून नेपाळमध्ये आपले पाय घट्ट रोवण्याचा प्रयत्न केला. परिणामी, भारत-नेपाळ संबंधांमध्ये निर्माण झालेला तणाव हा केवळ द्विपक्षीय न राहता प्रादेशिक राजकारणाचा भाग बनला. परंतु अलीकडील राजकीय घडामोडींमुळे परिस्थितीत बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नव्या नेतृत्वाच्या उदयानंतर नेपाळने पुन्हा संतुलित परराष्ट्र धोरण स्वीकारण्याचे संकेत दिले आहेत. भारताशी संवाद वाढवणे, विश्वास पुनर्स्थापित करणे आणि सहकार्याचे नवे मार्ग शोधणे या दिशेने प्रयत्न सुरू झाल्याचे दिसते. दोन्ही देशांनी उच्चस्तरीय भेटीगाठी, आर्थिक करार आणि पायाभूत प्रकल्पांच्या माध्यमातून संबंध सुधारण्याची तयारी दर्शवली आहे. भारतासाठी नेपाळ हा केवळ शेजारी देश नसून सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा भागीदार आहे. हिमालयीन पट्टा हा भारताच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी महत्त्वाचा असल्याने नेपाळमधील स्थैर्य भारतासाठी आवश्यक आहे. तसेच जलसंपत्ती, ऊर्जा निर्मिती आणि व्यापार या क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये प्रचंड सहकार्याची क्षमता आहे. नेपाळमध्ये जलविद्युत प्रकल्पांच्या माध्यमातून वीज निर्मिती वाढवून भारताला निर्यात करण्याची मोठी संधी आहे. यामुळे दोन्ही देशांना आर्थिक लाभ होऊ शकतो. दुसरीकडे, नेपाळसाठी भारत हा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. नेपाळच्या आयात-निर्यातीचा मोठा हिस्सा भारताशी संबंधित आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि व्यवसायाच्या संधींसाठी लाखो नेपाळी नागरिक भारतात येतात. त्यामुळे भारताशी चांगले संबंध राखणे हे नेपाळच्या आर्थिक आणि सामाजिक हितासाठी अत्यावश्यक आहे. नव्या नेतृत्वाने या वास्तवाची जाणीव ठेवून भारताशी संबंध सुधारण्याचा प्रयत्न करणे अपेक्षित आहे. तथापि, संबंध सुधारण्यासाठी केवळ राजकीय इच्छाशक्ती पुरेशी नसते. सीमावाद, पायाभूत सुविधा प्रकल्पांतील विलंब, व्यापारातील अडथळे आणि परस्पर अविश्वास या मुद्द्यांवर ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. दोन्ही देशांनी संवादाच्या माध्यमातून मतभेद सोडवले पाहिजेत. तसेच जनतेच्या स्तरावर विश्वास निर्माण करण्यासाठी सांस्कृतिक, शैक्षणिक आणि पर्यटन क्षेत्रातील देवाणघेवाण वाढवणे आवश्यक आहे. भारतानेही नेपाळकडे 'मोठा भाऊ' म्हणून नव्हे, तर समकक्ष भागीदार म्हणून पाहण्याची गरज आहे. नेपाळच्या सार्वभौमत्वाचा आदर ठेवत त्याच्या विकासात सहकार्य करणे ही भारताची जबाबदारी आहे. त्याचवेळी चीनसारख्या तृतीय शक्तींच्या प्रभावाला तोलण्यासाठी सकारात्मक आणि विश्वासार्ह भूमिका घेणेही महत्त्वाचे आहे. पायाभूत सुविधा, ऊर्जा, डिजिटल कनेक्टिव्हिटी आणि सीमाविकास या क्षेत्रांत भारताने अधिक सक्रिय सहभाग नोंदवला पाहिजे. आजच्या बदलत्या जागतिक आणि प्रादेशिक परिस्थितीत भारत-नेपाळ संबंधांना नव्या दृष्टिकोनातून पाहण्याची वेळ आली आहे. परस्पर हितसंबंध, आर्थिक सहकार्य आणि सांस्कृतिक जवळीक यांचा आधार घेत दोन्ही देशांनी संबंध अधिक मजबूत करणे आवश्यक आहे. नव्या नेतृत्वाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली सकारात्मक संधी साधून भारत आणि नेपाळ यांनी विश्वास, सहकार्य आणि स्थैर्याचा नवा अध्याय लिहिणे गरजेचे आहे. एकंदरीत, भारत-नेपाळ संबंध सुधारण्याची शक्यता निश्चितच निर्माण झाली आहे. मात्र ही सुधारणा टिकवून ठेवण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, संवेदनशील धोरण आणि परस्पर आदराची भूमिका आवश्यक आहे.

# जलजीवन मिशन अडचणीत; निधीअभावी योजना रखडल्या – आ. सत्यजित तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- पाण्याचे शाश्वत जलस्रोत न तपासता तयार करण्यात आलेले चुकीचे इस्टिमेट आणि राज्याकडे उपलब्ध नसलेला निधी यामुळे 'जलजीवन मिशन' योजना मोठ्या अडचणीत आली आहे. केंद्राने आपला वाटा दिला असून वाढीव निधी देण्यास नकार दिल्याने आता ही योजना पूर्ण कशी होणार, असा खडा सवाल आमदार सत्यजीत तांबे यांनी उपस्थित केला आहे. आठवडाभरात यासंदर्भात आढावा बैठक घेणार असल्याचेही त्यांनी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेत आ. तांबे यांनी शिक्षण विभागाची आढावा बैठक घेतली. या बैठकीनंतर बोलताना त्यांनी जलजीवन मिशनसह शिक्षण विभागाच्या कामकाजाबाबत माहिती दिली.

जिल्हाभरात सुमारे ४६५ अवघड किंवा दुर्गम क्षेत्र आहेत. बदली प्रक्रियेत अवघड व सोपे क्षेत्र विचारात घेतले जाते. आता नव्याने अवघड क्षेत्र घोषित करायचे आहेत. मात्र, काही शाळा दुर्गम ठिकाणी असूनही त्या अवघड क्षेत्रात समाविष्ट नव्हत्या. या पार्श्वभूमीवर नव्याने अवघड क्षेत्र निश्चित करताना प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्याचे आदेश आ. तांबे यांनी शिक्षण विभागाला दिले.

दरम्यान, जिल्ह्यात जीवन प्राधिकरणामार्फत हाती घेतलेल्या सुमारे ५७ योजनांपैकी केवळ तीन योजना पूर्ण झाल्या आहेत. तर जिल्हा परिषदेच्या ८२९ योजनांपैकी अवघ्या २७४ योजना पूर्ण आहेत. काही वाड्या-वस्त्या योजनांपासून वंचित राहिल्याने त्यांच्या समायोजनासाठी सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.

योजनांवरील खर्च सातत्याने वाढत असून सुधारित प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यातच अपूर्ण योजनांसाठी निधी उपलब्ध नसल्याने अनेक कामे ठप्प झाली आहेत. त्यामुळे जलजीवन मिशनची अंमलबजावणी आणि प्रगती मोठ्या अडचणीत सापडली असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

## जगासाठी दिलासादायक बातमी... (पान नं. ०१ वरुन)

(पान नं. ०१ वरुन-)

ते म्हणाले की, या संकटाच्या काळात दोन्ही बाजूंनी सामंजस्य आणि समतोल दाखवला असून शांतता प्रस्थापित करण्यात सकारात्मक भूमिका बजावली आहे. पाकिस्तानी पंतप्रधान म्हणाले, आम्हाला मनापासून आशा आहे की इस्लामाबादमधील चर्चा यशस्वी होईल.

दरम्यान, इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराण यांच्यात चर्चा होणार असल्याच्या वृत्तांदरम्यान, व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लिव्हिट यांनी एका निवेदनात म्हटले आहे, समोरासमोर चर्चेबाबत विचारविनिमय सुरू आहे, परंतु राष्ट्राध्यक्ष किंवा व्हाईट हाऊसकडून घोषणा होईपर्यंत काहीही निश्चित झालेले नाही.

दरम्यान इराणच्या सरकारी वृत्तवाहिनी आयआरआयबी वरून नुकतंच याबद्दलची घोषणा करण्यात आली आहे. या प्रसारित झालेल्या निवेदनात इराणचे सर्वोच्च नेते मुज्तबा खामेनेई यांनी सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे. हा युद्धाचा कायमस्वरूपी अंत नाही. परंतु सध्याची परिस्थिती पाहता सर्व लष्करी गटांनी सर्वोच्च नेत्याच्या आदेशाचे पालन करणे बंधनकारक आहे. सर्व लष्करी तुकड्यांनी तात्काळ गोळीबार थांबवावा, असे आदेश इराणचे सर्वोच्च नेते मुज्तबा खामेनेई यांनी दिले आहेत. या घोषणेनंतर इराणच्या सीमेवर शांतता पसरली असून लष्करी हालचाली थांबवण्यात आल्या आहेत. मात्र हा निर्णय घेण्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला अत्यंत कठोर इशारा दिला आहे.

जर इराणने माघार घेतली नाही, परिस्थिती बदलली नाही तर आज रात्रीच एका प्राचीन सभ्यतेचा कायमचा अंत होऊ शकतो. आज रात्री एक संपूर्ण सभ्यता नष्ट होईल, जी पुन्हा कधीही परत आणता येणार नाही. मला असे व्हावे असे वाटत नाही, पण कदाचित तसेच होईल. कदाचित काही क्रांतिकारी आणि अद्भुत घडू शकते, कोण जाणे काय होईल? असे डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले.या इशार्‍यानंतर काही तासांतच इराणच्या अनेक शहरांवर अमेरिकेने जोरदार एअरस्ट्राईक केले होते. त्यानंतरच ही युद्धविरामाची प्रक्रिया वेगाने पूर्ण झाली.

२८ फेब्रुवारीपासून अमेरिका आणि इस्रायलच्या सततच्या हल्ल्यांमुळे इराणमध्ये भीतीचे वातावरण होते. मात्र, सीजफायरची बातमी समजताच राजधानी तेहरानसह अनेक शहरांमध्ये नागरिक रस्त्यावर उतरले. हातात इराणचे राष्ट्रध्वज घेऊन लोक युद्धविरामाचा आनंद साजरा करताना दिसत आहेत.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद मिळकत हि मुळ मालक भास्कर नारायण निसाळ व इतर, रा. कल्याण रोड, नगर, ता.जि. अहिल्यानगर यांचे मालकीची असून सदर मिळकत ही प्रविण बाजीराव अभंग व सुधीर भागवत शेळके रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि अहिल्यानगर यांनी साठेखत प्राप्त झालेल्या हक्क व अधिकारात त्यांनी सदर मिळकत ही आमचे अशिल प्रविण बाजीराव अभंग व सुधीर भागवत शेळके यांचे नावे कायमखुश खरेदी देण्याचे मान्य व कबुल करुन तसे नोंदणिकृत साठेखत व्यवहार उभयतांमध्ये झालेला आहे व विसाराची रक्कम आमचे अशिलांकडून त्यांनी स्विकारलेली आहे. असे असतांना काही लोकांनी बेकायदेशिर खरेदीखत केलेले आहे. म्हणून सदर मिळकती संदर्भात मे. सिव्हील जज्ज साहेब, सिनिअर डिव्हीजन, संगमनेर यांचे कोर्टात रे.मु.नं. १०९/२०२२ हा दावा न्यायप्रविष्ट असुन मौजे ढोलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील स.नं./ गट नं. १ मधील क्षेत्र १हे. ६८ आर व पो. ख.०.५६ आर या मिळकती संदर्भात दिवाणी न्यायालयात दावा चालु असुन त्या दाव्या संदर्भात आज रोजी पर्यंत कोणतीही तडजोड झालेली नाही. त्या दाव्यात महसुल विभाग तर्फे तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, संगमनेर, दुय्यम निबंधक, उपअधिक्षक भूमिअभिलेख, सहाय्यक संचालक, नगररचना विभाग हे प्र. वादी नं.७ ते १० असुन आर्थिक व राजकीय दबाव टाकुन प्र.वादी नं.१० यांनी नियम व कायदयाचे उल्लघंन करुन न्याय प्रविष्ठ प्रकरणात मिळकतीचा तात्पुरत्या स्वरुपात बेकायदेशीरपणे रेखांकन मंजूर करून मिळकतीची सपाटीकरण करुन प्लॉट पाडण्याचे काम चालु असुन सदर प्लॉट विक्री करुन लोकांची/ ग्राहकांची फसवणुक करण्याचे विचारात आहे. असे झाल्यास भविष्यात त्यांना देखील न्यायालयीन कारवाईचा सामना करावा लागेल.

तरी सदर मिळकती संदर्भात कोणाचाही कोणत्याही प्रकारचा व्यवहार, बोजा, तारण, साठेखत, ताबेपावती, विसारपावती, बक्षीसपत्र, गहाण, दान, लिन, लिज, या प्रकारचे अगर इतर कोणत्याही वित्तीय संस्थेचा कोणत्याही प्रकारचा बोजा आणि व्यवहार करु नये.

मिळकतीचे परिशिष्ट जि. अहमदनगर, ता. संगमनेर पैकी मौजे ढोलेवाडी येथील गंगासृष्टी समोरील ग्रामपंचायत हददीतील व मे. दुय्यम निबंधक साहेब, संगमनेर यांचे नोंदणी कक्षेतील शेत जमीन मिळकत स.नं./ ग.नं. १, क्षेत्र १हे.६८ आर पो.ख. ०.५६ आर सदर मिळकतीच्या चर्तु: सिमा गाव नकाशा रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे येणे प्रमाणे चर्तु: सिमापुर्वक मिळकतीचे वर्णन असे.

**ठिकाण–संगमनेर**
**दिनांक– ०८/०४/२०२६**

**श्री. प्रविण बाजिराव अभंग**
**संगमनेर ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर**


**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ जन्म नोंद/५०७/२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
संगमनेर, दिनांक – १७/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री. मुनीर इस्माईल पठाण, रा. करुले, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक १०/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. करुले, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे मुनीर इस्माईल पठाण, यांचा जन्म मौजे करुले, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०४/१२/१९६६ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी करुले यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी करुले यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई–मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ जन्म नोंद/५०८/२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
संगमनेर, दिनांक – १७/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्री.वजीर इस्माईल पठाण, रा. करुले, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक १०/०२/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. करुले, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे वजीर इस्माईल पठाण, यांचा जन्म मौजे करुले, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक ०१/०३/१९७१ रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी करुले यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी करुले यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**पाहिजेत**
मेडिकल दुकानासाठी महिला पाहिजे
कॉम्प्युटर ऑपरेटर - २
हेल्पर - २
प्रभात मेडिकल, नवीन नगर रोड, ताजने मळा, संगमनेर
9921245753

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – ०२
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०२ जागा
टॅली कोर्स
ड्रायव्हर - ३ जागा
कॉम्प्युटर ऑपरेटर
संपर्क - डॉ. इथापे हॉस्पिटल, नवीन नगर रोड संगमनेर
9370071777
9822791484

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7030125701

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

**पाहिजेत**
शिलाई मशीन कामासाठी महिला - ०२
सेल्स एक्झिक्युटिव्ह - ०१
अमोल होम डेकोर मालदाड रोड, संगमनेर
8788483245
8698001007

**पाहिजेत**
श्रद्धा क्लिनिक आणि पंचकर्म सेंटर
रिसेप्शनिस्ट – १ (महिला)
वेळ – सकाळी ९ ते ५
ताजणे मळा, प्रभात मेडिकल समोर, संगमनेर
7498749500

**भाड्याने देणे आहे**
सर्व सुविधायुक्त ०१ बीएचके रो-हाऊस भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन | कॅशियर
स्टोअर मॅनेजर
फ्लोअर मॅनेजर
हेल्पर | सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ
१० ते ७ | १२ ते ९
9511238422

**वॉचमन पाहिजे**
बांधकाम साईट वर वॉचमन भरणे आहे
राहण्याची सोय आहे
संपर्क – नविन नगर रोड, संगमनेर
8378956909
8459199913

**पाहिजेत**
संगमनेर शहरात ऑफिस कामाकरिता पदवीधर मुलगा पाहिजे
आकर्षक पगार
9881855547

**WE ARE HIRING**
JOIN OUR TEAM
CorelDRAW Ps Ai Id
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**युवावार्ता** परिवर्तनाचा पुरस्कर्ता
**पाहिजेत**
अकाऊंटंट | जागा ०२
टॅली ईआरपी ९ चे ज्ञान आवश्यक, अकौंट, बँक, रिपोर्ट जनरेशन, सॅलरी, जीएसटी, रिकव्हरी आदींचे सखोल ज्ञान आवश्यक,
अनुभव : ३ वर्षे
आकर्षक पगार व इतर सुविधा
बायोडाटा पाठवा - ९८२२०३९४६०
dailyyuvavarta@gmail.com
वाटचाल तीन दशकांची

**पाहिजेत**
मार्केटिंगसाठी मुलगा पाहिजे – ०२ जागा (गाडी व लायसन्स पाहिजे)
दुकानकामासाठी डिलीव्हरी बॉय पाहिजे – ०२ जागा
9766921306

**पाहिजेत**
अकाउंटंट - ०१ जागा (बी.कॉम/ एम.कॉम) टॅली प्राईम
मायक्रोबायोलॉजी - ०१
हेल्पर (मुले/मुली)- ०३
२ ते ३ वर्ष अनुभव
रास्पबेरी ॲग्रो बिझनेस प्रा.लि., गोडगे इंडस्ट्रीअल इस्टेट, संगमनेर एम.आय.डी.सी च्या बाजूला,वेल्हाळे रोड
9860284257
raspberryagrosales@gmail.com






MALPANI
卐 अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर 卐
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण – मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण–गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन– सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# रोहित पवारांच्या अर्जावर ईडीचा कडक पवित्रा

## आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात नवे वळण

मुंबई (प्रतिनिधी)-

मुंबईत शिखर बँक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात नवे कायदेशीर वळण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे नेते रोहित पवार यांनी या प्रकरणात दोषमुक्तीची मागणी करत विशेष सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मात्र, या अर्जावर केवळ तांत्रिक मुद्द्यांवर नव्हे, तर प्रकरणाच्या गुणवत्तेच्या आधारे निर्णय घ्यावा, अशी स्पष्ट मागणी सक्तवसुली संचालनालयाने न्यायालयासमोर केली आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या मूळ गुन्ह्याचा तपास बंद करण्यात आला आहे. आर्थिक गुन्हे शाखेने प्रकरण बंद करण्याची शिफारस करणारा अहवाल सादर केला होता, जो विशेष न्यायालयाने स्वीकारला. याच मुद्द्यावर आधार घेत रोहित पवार आणि इतर ११ जणांनी दोषमुक्तीसाठी अर्ज केला आहे. त्यांचा दावा आहे की, मूळ गुन्हाच बंद झाल्याने त्यावर आधारित ईडीचे प्रकरण टिकू शकत नाही. मात्र, ईडीने या युक्तिवादाला विरोध करत न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. कनिष्ठ न्यायालयाने अहवाल स्वीकारला असला, तरी ईडीने यापूर्वी दाखल केलेल्या हस्तक्षेप अर्जाबाबतचा निर्णय उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आला असून, तो अजून प्रलंबित आहे. त्यामुळे अंतिम निर्णय घेताना सर्व बाबींचा सखोल विचार करणे आवश्यक असल्याचे ईडीने नमूद केले आहे. फक्त प्रक्रियात्मक कारणांवर आरोपींना दिलासा देऊ नये, असेही ईडीने स्पष्ट केले.

ईडीच्या आरोपांनुसार, कन्नड सहकारी साखर कारखान्याच्या व्यवहारात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे. हा कारखाना रोहित पवार यांच्या बारामती ग्रो लिमिटेडशी संबंधित असल्याचा दावा करण्यात आला आहे. या कारखान्यावर सुमारे ८०.५६ कोटी रुपयांचे कर्ज थकीत होते. हे कर्ज वसूल करण्यासाठी शिखर बँकेने १३ जुलै २००९ रोजी सरफेसी कायद्याअंतर्गत कारवाई करत मालमत्ता ताब्यात घेतली होती. यानंतर ३० ऑगस्ट २०१२ रोजी या कारखान्याचा लिलाव करण्यात आला. मात्र, ईडीच्या मते, हा लिलाव प्रक्रियेत अनियमितता करून करण्यात आला. एका कथित मूल्यांकन अहवालाच्या आधारे कारखान्याची किंमत कमी दाखवण्यात आली.

# एमकेसीएल ऑलिंपियाडमध्ये मालपाणी विद्यालयाचा गौरीशंकर जोशी प्रथम



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

येथील मालपाणी विद्यालयाने पुन्हा एकदा शैक्षणिक क्षेत्रात आपला ठसा उमटवत, उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा विद्यार्थी गौरीशंकर समर्थ जोशी (इयत्ता ६वी) याने महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल) आयोजित संगणकावरील ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षा २०२५ मध्ये विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. या यशाबद्दल गौरीशंकर याला इलेक्ट्रो-मॅग्नेटिक इलेक्ट्रिसिटी किट, तसेच प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले. त्याच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, शिक्षक व पालकांनी त्याचे कौतुक केले आहे.

या स्पर्धेचे आयोजन एक्सपर्ट कॉम्प्युटर्स यांच्या वतीने करण्यात आले होते. संस्थेच्या सीमा जोशी-अंत्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत, परीक्षा यशस्वीपणे संपन्न झाली. पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी सीमा जोशी-अंत्रे यांचा विद्यालयाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच एक्सपर्ट कॉम्प्युटर्सच्या वतीने नवनिर्वाचित मुख्याध्यापक व पर्यवेक्षिका यांचाही सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना सीमा जोशी-अंत्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले की, आजच्या युगात संगणकाचे ज्ञान अत्यंत आवश्यक बनले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्साहाने सहभागी होऊन आपली कौशल्ये विकसित करावीत, असे सांगून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकुतला खरात यांनी प्रभावीपणे केले, तर पर्यवेक्षिका रंजना पवार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" राज्यव्यापी अभियानाचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

## उपमुख्यमंत्री, आरोग्य मंत्र्यासह मंत्रिमंडळाची उपस्थिती



(जिल्हा माहिती अधिकारी)-

जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी, आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने, राज्य शासनाच्या माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

राज्य शासनाने माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याचा संकल्प केला आहे. लोकसहभागातून ही मोहीम व्यापक आरोग्य चळवळ म्हणून उभी राहावी, हा शासनाचा मानस असून, गावपातळीपासून राज्यस्तरापर्यंत आरोग्य सेवांचे सक्षमीकरण करण्यावर भर देण्यात येणार आहे.

या अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर अधिक भर देणे. स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, पोषण, तसेच संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण, यासारख्या मूलभूत घटकांवर लक्ष केंद्रित करून ग्रामीण नागरिकांच्या आरोग्यदायी जीवनशैलीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. माता-बाल आरोग्य, मानसिक आरोग्य आणि बदलत्या जीवनशैलीशी निगडित आजारांनाही या मोहिमेत विशेष स्थान देण्यात आले आहे.

या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा आणि ग्रामपंचायत स्तरावर समित्यांची स्थापना करण्यात आली असून, ठरावीक निकषांनुसार उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. यासाठी राज्य शासनाने मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असून, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच आरोग्य संस्थांना ६५.२५ कोटी रुपयांचे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अभियान केवळ योजना नसून एक लोकचळवळ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्रातील आरोग्याचा स्तर उंचावून, निरोगी, सशक्त आणि समृद्ध समाज घडविण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचा विश्वास यावेळी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केला.

# चैतन्येश्वर देवस्थान गुंजाळवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

संगमनेर

(युवावार्ता प्रतिनिधी)-

सालाबाद प्रमाणे याही वर्षी चैतनेश्वर देवस्थान, गुंजाळवाडी (उंबराचा मळा) या ठिकाणी गुरुवार, दिनांक ९.४.२०२६ ते मंगळवार, दिनांक १४.४.२०२६ पर्यंत भव्य पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या निमित्ताने पहाटे चार ते सहा काकडा भजन, सकाळी दहा ते बारा गाथा भजन, दुपारी बारा ते चार शिवलीलामृत पारायण सोहळा, सायंकाळी पाच ते सहा सामुदायिक हरिपाठ, व रात्री ६:४५ ते ९.१५ श्री हरी कीर्तन, व कीर्तनानंतर अन्नदात्यांच्या अनमोल अशा सहकार्याने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी पहिल्या दिवशी गुरुवार शालिनीताई देशमुख इंदुरीकर, दुसऱ्या दिवशी शुक्रवार शिवशाहीर गौरीताई सांगळे, तिसऱ्या दिवशी शनिवार विनोदाचार्य सागर महाराज दिंडे, चौथ्या रविवार दिवशी कविराज महाराज झावरे, पाचव्या दिवशी जागराची कीर्तन सेवा सोमवार श्रावण महाराज जगताप, व सहाव्या दिवशी मंगळवार काल्याचे कीर्तन सेवा सायंकाळी ६:४५ ते रात्री नऊ पर्यंत ह.भ.प. भरत महाराज जोगी यांची संपन्न होऊन, त्यानंतर अन्नदात्यांच्या अनमोल असा सहकार्याने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी पंचक्रोशीतील सर्व भावी भक्तांनी कीर्तन श्रवण व महाप्रसादासाठी भरपूर संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन चैतनेश्वर देवस्थान कमिटी, उंबराचा मळा, गुंजाळवाडी, व गुंजाळवाडी गावचे लोकनियुक्त सरपंच साईभक्त श्री अमोल उर्फ नरेंद्र संभाजी गुंजाळ यांनी दिली आहे.

# मुंबईतून मतदानासाठी केरळला जाणाऱ्या नागरिकांच्या बसला काँग्रेस प्रदेशाध्यक्षांनी दाखवला हिरवा झेंडा



मुंबई (प्रतिनिधी)-

देशातील चार राज्ये व एका केंद्रशासित प्रदेशात विधानसभेच्या निवडणुका होत असून, ९ तारखेला केरळमध्ये मतदान होत आहे. मुंबईतील केरळचे नागरिक आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आज आपल्या गृहराज्यात रवाना झाले. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ यांनी मुंबईतून केरळला जाणाऱ्या बसला हिरवा झेंडा दाखवून शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार अमिन पटेल व काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यावेळी म्हणाले की, निवडणुका लोकशाहीचा उत्सव आहे आणि लोकशाही पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. केरळचे जे लोक रोजीरोटीसाठी मुंबईत आहेत, ते आज केरळला जात आहेत, ही चांगली गोष्ट आहे. मतदानाच्या दिवशी अनेक लोक सुट्टी समजून मतदानाला न जाता बाहेरगावी पर्यटनाला, सहलीला जातात, पण केरळचे नागरिक जेथे काम करतात, तेथून निवडणुकीच्यावेळी आपल्या राज्यात जातात. वोटचोरीमुळे निवडणूक प्रक्रिया डागाळलेली आहे, पैसा फेक तमाशा देख, असे चित्र असताना, मतदानासाठी आपल्या राज्यात जाणे ही अत्यंत चांगली घटना आहे. १०० टक्के मतदान कसे होईल, यासाठी सर्वांनी काम केले पाहिजे. केरळचा माणूस कामासाठी दुसऱ्या राज्यात जातो, पण मतदानाला मात्र आवर्जून आपल्या राज्यात जातो. आखाती देशातील युद्धामुळे अनेक केरळी नागरिक अडकून पडले आहेत, त्यांना मतदानात सहभागी होता येत नाही, त्याची हळवळ आहे, असेही सपकाळ म्हणाले.

बारामतीच्या पोटनिवडणुकीवर बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, बारामती पोटनिवडणुकीवरून कोणताही वाद नाही. लोकशाहीच्या उत्सवात सुचिते अनुसार कोणी पुढे जात असेल, तर त्यात वावगे काय, असे सपकाळ म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यसभा खासदार पार्थ पवार यांनी काँग्रेसबद्दल केलेल्या विधानावर बोलणे मात्र सपकाळ यांनी टाळले.

# अन् चालले राहु केतु बंगालमधील बेरोजगारी दूर करायला!

## पाच वर्षांत दोन लाख कंपन्या बंद, लाखो कामगार झाले बेरोजगार

कोणाचा पटकन विश्वास बसणार नाही, पण २०२०-२१ ते २०२४-२५ या पाच वर्षांत भारतातील दोन लाख कंपन्या बंद पडल्या. नक्की आकडा सांगायचा तर २ लाख ४ हजार २६८ इतक्या खासगी कंपन्या पाच वर्षांत बंद झाल्या. केंद्र सरकारनेच संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेमध्ये ही माहिती दिली. त्यानंतरच्या एका वर्षभरात आणखी किती कंपन्या बंद झाल्या, ही माहिती अद्याप यायची आहे. केंद्रीय राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा यांनी दरवर्षी देशातील किती कंपन्या बंद पडल्या, याची आकडेवारी दिली. त्यानुसार २०२०-२१ मध्ये १५ हजार २१६ कंपन्या बंद पडल्या, तर २०२१-२२ मध्ये ६४ हजार ५४ कंपन्या बंद झाल्या. त्यानंतरच्या २०२२-२३ मध्ये ८३ हजार ४५२ आणि २०२३-२४ मध्ये २१ हजार १८१ कंपन्या बंद झाल्या. नंतर म्हणजे २०२४-२५ साली २० हजार ३६५ कंपन्या बंद पडल्या.

यापैकी काही शेल, म्हणजे बोगस, तर काही आधीचे डबघाईला आलेल्या असतील. पण पाच वर्षांत दोन लाखांहून अधिक कंपन्या बंद व्हाव्यात? त्यातील अनेक कंपन्या काही ना काही निर्मिती व उत्पादन करणाऱ्या असतील, काही कदाचित सेवापुरवठा देणाऱ्या असतील. म्हणजे त्यात अनेक कामगार-कर्मचारी नक्की होते. त्या बंद पडल्याने देशातील कित्येक लाख कामगार व कर्मचारी बेरोजगार झाले असतील. या कंपन्या बंद का झाल्या, याची माहिती सरकारच्या उत्तरातून आलेली नाही, वा खासदाराने तसा प्रश्न विचारल्याचं माहितीतून जाणवत नाही.

बेरोजगारीचा दर पूर्वीपेक्षा खूप कमी झाला आहे, दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या कमी झाली आहे, असे केंद्र सरकार सांगताना दिसतं. प्रत्यक्षात मात्र २ लाख कंपन्या बंद झाल्या आहेत. त्या बंद का झाल्या, त्यामुळे किती कामगार बेरोजगार झाले, त्या कसलं उत्पादन करत होत्या, बेरोजगार झालेल्या इतक्या कामगारांचं काय झालं, त्यांना दुसरा रोजगार मिळाला का, हे प्रश्नही विचारले जाणं आणि त्यांची उत्तरं येणं गरजेचं आहे.

अमेरिका-इराण युद्धाचा फटकाही देशातील बहुसंख्य कंपन्या व उद्योगांना बसला आहे. गॅस टंचाई हे एक महत्त्वाचं कारण आहे आणि दुसरं म्हणजे युद्धामुळे विशिष्ट उत्पादनांच्या निर्यातीवर बंधनं आली आहेत. निर्यात कमी झाल्याने, थांबल्याने काहींनी उत्पादन थांबवलं वा कमी केलं आहे. कोविडमधून उद्योग जरासे सावरत असतानाच युद्धाचा परिणाम उद्योगांना व कामगारांना जाणवू लागला आहे. त्यामुळे मुंबई, सुरत, दिल्ली आदी शहरातील कामगार गावी परतत असल्याच्या बातम्या येत आहेत.

देशात सेवा पुरवठा देणाऱ्या कंपन्या वाढल्या आहेत, पण तिथं कामं करणारे सारेच कंत्राटी कामगार आहेत. गिग वर्कर्स. ते दिवसभर ओझी वाहत रस्त्यांवर फिरत असतात. त्यांना ना प्रॉव्हिडंड फंड, ग्रॅच्युइटी, पेन्शन, ना कामाचे तास. दिवसभरात जितक्या ऑर्डर पोहोचवणार, त्यानुसार हातात पगार मिळणार. आयुष्यात कसलीच खात्री नसलेले लाखो व कोटी-दोन कोटी कामगार वाढणं आणि तब्बल दोन लाख कंपन्या बंद पडून तितके वा कमी-जास्त लोक बेरोजगार होणं, ही चिंतेची बाब आहे. हे आधी मुंबईत घडलं, ठाणे, रायगड, नवी मुंबईतही घडताना



दिसलं आणि आता देशभर हे चित्र दिसू लागलं आहे.

मुंबई ही जशी भारताची राजधानी म्हणून ओळखली जाते, तशी औद्योगिक राजधानी म्हणून तिची ओळख होती. इंजिनियरिंग, मॅन्युफॅक्चरिंग, केमिकल, रासायनिक, कापड, वाहननिर्मिती आदी सर्व उद्योग पूर्वापार मुंबईत होते. मुंबईत अंधेरीची एमआयडीसी, सीप्झ, ठाण्याची वागळे इस्टेट, मुंबई-आग्रा रोडवर (लालबहादूर शास्त्री मार्ग) औषधी कंपन्या, नवी मुंबईतील रासायनिक, औषध कंपन्या, भिवंडीत हातमाग आणि यंत्रमाग, तारापूरचे इंजिनियरिंग कारखाने, डोंबिवली एमआयडीसी, रायगडमधील सर्व, विशेषतः रासायनिक उद्योग, या सर्वांचा त्यात समावेश असे. शिवाय १९८२ पर्यंत कापड गिरण्याही होत्या. त्या काळात प्रीमिअर पद्मिनी, रिचर्डसन अँड क्रूडास, नोसिल, सुपरमॅक्स, स्टँडर्ड अल्कली, हर्डीलिया, पोयशा, सीमेन्स, भारत बिजली, रॅलीज, सविता केमिकल, टिफिल, लंडन पिल्सनर अशा शेकडो मोठ्या व लहान कंपन्या व कारखान्यात लाखो ब्ल्यू कॉलर कामगार काम करायचे. मुंबईत अनेक औद्योगिक वसाहती होत्या. त्यातील छोट्या उद्योगांत काम करणाऱ्यांत स्त्रियांचं प्रमाण खूप मोठं होतं. अंधेरी स्टेशनहून खासगी बसने महिला कर्मचाऱ्यांना सीप्झमध्ये नेण्यात येई. मुंबई तेव्हा खरोखरच औद्योगिक राजधानी होती. देशातील औद्योगिक चळवळीचं सर्वात मोठं केंद्रच हे शहर होतं.

कामगारांच्या संपामुळे सर्व कापड गिरण्या बंद झाल्या आणि इतर उद्योगांतील कामगार हादरून गेले. त्यांची न्याय्य मागण्यांसाठी लढण्याची शक्ती क्षीण झाली. ते खचून गेले. तेच काय, कामगार संघटनाही खचल्या. त्याच काळात जमिनीच्या किमती आकाशाला भिडू लागल्या होत्या. मोठ्या शहरांत उद्योग उभारणे आणि चालवणे खूप खर्चिक असल्याचं या मालकांच्या लक्षात आलं. त्यापेक्षा मुंबईत छोटं नोंदणीकृत कार्यालय ठेवून उद्योग अन्य राज्यांत न्यावा, असा विचार मालकांच्या मनात घोंघावू लागला. राज्य सरकारची उद्योगस्नेही नसलेली वा त्रासदायक धोरणं, हक्कासाठी लढणाऱ्या कामगार संघटना व नेते, यातून मुक्तता करून घेण्याचं त्यांनी ठरवलं. कारखाने बंद करून जमिनीवर उंच इमले बांधण्यासाठी राज्य सरकारांनीही साथ दिली. जणू त्यांना उद्योगांची कटकट नकोच होती. संप, आंदोलनं, मोर्चे, हा तणाव सरकारला नकोसा झाला होता. औद्योगिक शांततेच्या नावाखाली उद्योगच बंद करणं सुरू झालं.

या व अशा असंख्य कारणांमुळे मुंबई व आसपासच्या परिसरातील अनेक कारखाने गेल्या २०/२५ वर्षांत बंद झाले किंवा अधिक सवलती, सोयी देणाऱ्या राज्यांत निघून गेले. मुंबईचा एमआयडीसी, सीप्झ परिसर सुनासुना झाला आहे. पूर्वीसारखी कामगारांची वर्दळ दिसत नाही. वागळे इस्टेटमधील कारखाने पाणीटंचाईमुळे हैराण आणि बंद आहेत, वा अन्यत्र जात आहेत. जिथं तीन शिफ्टमध्ये काम चालायचं, तिथं एकच पाळीत कसंबसं काम चालतं. पाणी नाही, त्या दिवशी काही कारखाने पूर्ण दिवस बंद ठेवले जात आहेत. डोंबिवलीतील एमआयडीसीमधील उद्योगही गुजरातेत गेले व चालले आहेत.

गेल्या २० वर्षांत राज्यातील कैक हजार ५०० बंद झाले आणि लाखो कामगार बेकार झाले. तारापूरमध्ये बंद उद्योगांची संख्या एक हजाराहून अधिक आहे. बंद कारखान्यातील सामानाची चोरी, ही तेथील समस्या आहे. वागळे इस्टेट, डोंबिवली, ठाणे-बेलापूर पत्ता येथील सुमारे चार हजार लहान-मोठे उद्योग बंद आहेत. अगदी सुरुवातीला ज्या बड्या कंपन्यांचा उल्लेख केला, त्या सर्व बंद झाल्या आहेत. भायखळ्याची रिचर्ड्स अँड क्रूडास कित्येक वर्षं बंद आहे. क्रॉम्पटनसह अनेक कंपन्या बाहेरून कंत्राटी पद्धतीने उत्पादने तयार करून घेत आहेत. रायगडची स्थितीही वेगळी नाही. खालापूर, खोपोली परिसरातील हायको केमिकल, मोता, झेनिथ बिर्ला स्टील, ॲम्फॉर्स अशा एक हजारांहून मोठ्या व लहान कंपन्या बंद झाल्या आहेत. रोहा, महाड, रसायनी येथेही स्थिती वेगळी नाही. रायगड व अन्य ठिकाणच्या कंपन्या बंद झाल्याने कामगारांचा रोजगार तर गेलाच, पण त्यांची येणीही मिळालेली नाहीत. हे कारखाने बंद पडून उभा राहत आहे सेवा उद्योग. त्यासाठीचं कौशल्य कामगारांकडे नाही. त्यामुळे अनेकांच्या हाताला काम नाही. मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील माथाडी कामगारांवरही हळुहळू बेकारीची कुऱ्हाड कोसळणार, असं चित्र आहे. काहींचा रोजगार गेलाच आहे.

मुंबईला देशाची औद्योगिक राजधानी बनवण्यासाठी ज्या कारखानदारांनी उद्योग आणले, त्यांना आता मुंबई नकोशी झाली आहे. मुंबईच्या औद्योगिक उभारणीत मोठा वाटा असलेले कामगार व त्यांची मुलं गिग वर्कर्स आहेत. त्यांची कामगार संघटना नाही. आतापर्यंत कामगारांनी लढून जे मिळवलं, ते नव्या रचनेत हाती लागणं शक्य नाही. कुठे दिसतात कामगारांची मोठी आंदोलनं? कुठे दिसतात का ताठ मानेने लढणारे कामगार? सध्या दिसतात पाठीवर मोठं ओझं घेऊन आणि मान खाली घालून इथं तिथं भटकणारे लाखो तरुण कामगार. ही परिस्थिती बदलणार कधी व बदलवणार कोण?

**सहकार्य**
**सोशल मिडीया**

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरू होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन ................ 05
सेल्सगर्ल................ 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर.......................... 03
We are HIRING!
भंडारी
We are HIRING!
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# शेतकऱ्यांवर दुहेरी संकट; उत्पादन घटले, खर्च वाढला

## वादळी वाऱ्याने गहू भुईसपाट; कांदा उत्पादक अडचणीत



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील झरेकाठी, चणेगाव परिसरात अवकाळी पाऊस वादळी वाऱ्यामुळे गहू, कांदा, मका व अनेक रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी वर्ग अडचणीत सापडला असून. नुकसानग्रस्त पिकाची काढणी करणे आता शेतकऱ्यांना अडचणीचे ठरत आहे. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी गव्हाचे पिके भुईसपाट झाले आहे. अवकाळी पावसामुळे कांदा पिकालाही मोठा फटका बसला आहे. भुई सपाट झालेल्या गव्हाची सोंगणी करण्यासाठी मजूर मिळणे कठीण झाले असून सोंगणीचा खर्च किमान आठ हजार रुपये प्रति एकर आहे. त्यानंतर मळणीसाठी पोत्यामागे सुमारे ३०० रुपये खर्च येत आहे. दरम्यान पावसामुळे गव्हाचा रंग बदलल्याने व्यापाऱ्यांकडून कमी दर दिला जात आहे. सध्या चांगल्या गावाला प्रति क्विंटल २२०० ते २३०० रुपये दर मिळत असला तरी नुसकानग्रस्त गव्हाला त्यापेक्षा कमी भाव मिळत आहे.

कांदा उत्पादकांचीही अवस्था बिकट झाली आहे. अवकाळी पावसामुळे कांद्याची साठवणूक कठीण झाली असून तो लवकर खराब होण्याचा धोका वाढला आहे. त्यातच निर्यात घटल्याने कांद्याचे दरही घसरले आहेत. परिणामी उत्पादन खर्चही वसूल होणे अवघड झाली आहे. या सर्व परिस्थितीत रब्बी पिके काढावेत की शेतातच ठेवावीत . अशा मनस्थितीत शेतकरी सापडला आहेत.

याबाबत अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपद मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना झरेकाठी येथील जनसेवा युवा मंचचे सदस्य यांनी अवकाळी पावसामुळे पिकांचे पंचनामे करण्याबाबत व शासनाकडून मदत मिळण्याबाबत निवेदन दिले आहे महसुली विभाग व कृषी विभाग यांनी पंचनामे केली आहेत. आता शेतकरी शासनाच्या मदतीकडे वाट बघत आहे.

# कंत्राटदारांचे 'बेमुदत काम बंद' आंदोलन सुरू

## लाडकी बहीण योजनेचा परिणाम? कंत्राटदारांची देयके अडकली

मुंबई (वृत्तसंस्था)

जिल्हा पातळीवर केलेल्या शासकीय कामांची देयके गेली १६ महिने मिळत नसल्याने राज्यातील शासकीय कंत्राटदारांनी ७ एप्रिल पासून 'बेमुदत काम बंद' आंदोलन सुरू केले आहे. याचा फटका मान्सूनपूर्व कामांना बसणार आहे. जलसंपदा, नगरविकास, पर्यटन, ग्रामविकास, जलजीवन विभागाच्या कामांची ९६ हजार ५०० कोटी रुपये थकबाकी आहे.


राज्यातील तीन लाख छोटे मोठे कंत्राटदार ग्रामपंचायत ते जिल्हा परिषद पातळीवर शासकीय नागरी कामे करतात. सार्वजनिक बांधकाम, जलजीवन मिशन, ग्रामविकास, पर्यटन, नगरविकास, जलसंपदा, जिल्हा नियोजन विभागाअंर्तगत काढण्यात येणारी कामांचा समावेश असतो. लाडकी बहीण योजने नंतर राज्याची आर्थिक स्थिती खालावली आहे. त्याचा फटका या कंत्राटदारांच्या देयकांना बसला आहे. कंत्राटदारांची गेल्या वर्षी १ लाख १६ हजार कोटी रुपये थकीत होते. कंत्राटदारांनी केलेल्या आंदोलनामुळे सरकारने २० हजार कोटी रुपये अदा केले आहेत. एक लाख रुपये दयेक थकबाकी असलेल्या कंत्राटदाराला पाच सहा हजार रुपये देऊन कंत्राटदारांच्या जखमांवर मीठ चोळण्यात आले. कंत्राटदारांनी थकीत दयेके द्यावीत म्हणून मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांची भेट घेतली. तीन कंत्राटदारांनी या आर्थिक समस्याला कंटाळून आत्महत्या केल्याचा आरोप कंत्राटदारांच्या महासंघाने केला आहे. शेतकऱ्यांप्रमाणे कंत्राटदारही आत्महत्याच्या निर्णयापर्यंत आले असल्याचे संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी सांगितले.

कंत्राटदारांची दयेके दिली जातील असे, आश्वासन अनेक वेळा दिले गेले आहे पण ते सरकार पूर्ण करु शकले नाही. अर्थसंकल्पीय अधिवेशनात जयंत पाटील, विजय वडेट्टीवार, नाना पटोले या विरोधकांनी कंत्राटदारांच्या दयेकाचा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला होता. लाडक्या बहीण योजनेमुळे सरकारच्या तिजोरीवरील ताण वाढला आहे. त्याचा परिणाम स्थानिक पातळीवर होणाऱ्या नागरी कामांची दयेकांवर झाला आहे. सध्या मान्सून पूर्वे कामे स्थानिक पातळीवर सुरु आहेत. कंत्राटदारांनी सात एप्रिल पासून राज्यातील शासकीय कामे बंद करून आंदोलन सुरू केले आहे.

# कैलाश सत्यार्थी यांना 'लता दीनानाथ मंगेशकर' पुरस्कार

पुणे (वृत्तसंस्था)

यंदाचा 'लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार २०२६' नोबेल पुरस्कार विजेते कैलाश सत्यार्थी यांना जाहीर करण्यात आला आहे. पुण्यात पार पडलेल्या पत्रकार परिषदेत ज्येष्ठ संगीतकार, गायक पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी या पुरस्काराची घोषणा केली. हा पुरस्कार मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८४ व्या स्मृतिदिनानिमित्त म्हणजे २४ एप्रिल रोजी पुण्यात प्रदान केला जाणार आहे.



यंदाच्या इतर पुरस्कार विजेत्यांमध्ये महेश काळे, सुबोध भावे, प्राजक्ता माळी, रविना टंडन यांच्यासह उत्कृष्ट नाट्य निर्मितासाठी 'भूमिका' या नाटकाला 'मोहन वाघ पुरस्कारा'ने गौरवले जाणार आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर स्मृती प्रतिष्ठान आणि हृदयेश आर्ट्स यांच्या वतीने, सकाळ मीडिया समूहाच्या सहकार्याने आयोजित हा सोहळा देशातील एक अत्यंत मानाचा सांस्कृतिक उपक्रम मानला जातो. कला, साहित्य आणि समाजकार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्याची ही परंपरा आहे. 'भावगंधर्व' स्वरूपातील या कार्यक्रमातून मंगेशकर कुटुंबाचा समृद्ध वारसा अधोरेखित होतो. यंदाच्या पुरस्कार विजेत्यांमध्ये संगीतासाठी महेश काळे, नृत्यासाठी शमा भाटे, नाटक व चित्रपटासाठी सुबोध भावे, चित्रपटासाठी रवीना टंडन आणि प्राजक्ता माळी, पत्रकारितेसाठी सुशील कुलकर्णी, साहित्यासाठी अच्युत गोडबोले, विशेष पुरस्कारासाठी डॉ. धनंजय केळकर, समाजकार्यासाठी ठाणे येथील वसुंधरा संजीवनी मंडळाचे आनंद भागवत यांचा समावेश आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्स्पर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ | * कर्ज व्याजदर कमी | * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

## युवा न्यूज डिजिटल वाचक प्रतिसाद

दैनिक युवावार्ता परिवर्तनाचा पुरस्कर्ता

युवा न्यूज डिजिटल क्षेत्रात कार्यरत असताना अनेक व्हिडिओंना एक लाखाच्या पुढून व्हूज मिळालेले आहेत. अत्यंत गंभीर घटनांच्या संदर्भातील व्हिडिओंना वाचकांचा उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असताना दैनिक युवावार्ताद्वारे डिजिटल युवा प्रतिसाद माहिती वाचकांना देत आहोत. वाचकांनी आपले अभिप्राय कळविण्याची विनंती.

अहिल्यानगर शहरातली पत्रकारांनी पत्रकार कट्टा उपक्रम सुरू केला. त्यावेळी डॉ. गोराणे यांनी अंधश्रद्धा म्हणजे श्रद्धेच्या बाजारातील काळाबाजार याविषयी मत व्यक्त केले. त्यासंदर्भातील व्हिडिओ वाचकांच्या माहितीसाठी युवा न्यूज द्वारे QR कोड देत आहोत.

चैतन्य हॉस्पिटल
• अतिदक्षता विभाग
• मधुमेह व हृदयरोग
• दमा व श्वसनाचे विकार
• फुफ्फुसासंबंधी औषधोपचार
• जनरल सर्जरी
• पोटाचे विकार व शस्त्रक्रिया
• किडनी विकार
• मेंदू विकार व शस्त्रक्रिया
• सर्पदंश व विषबाधा
• बालरोग चिकित्सा विभाग
• प्लास्टिक सर्जरी व व्यंगोपचार
• संधीवात व मणके विकार
आपत्कालीन औषधे व उपचार
सर्व कंपनीजच्या कॅशलेस सुविधा उपलब्ध
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
०२४२५ - २२४७६२, मोबा. ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर - 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25